नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

युगवाणी

संपादक :
वामन कृष्ण चोरघडे

टोबर १९४९ ☆

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वा. कृ. चोरघडे,
संपादक 'युगवाणी'
वझलवार कॉलनी, न्यू ब्लॉक्स,
धरमपेठ, नागपूर (सी. पी.)

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती. (वऱ्हाड).

आक्टोबर १९४९

अनुक्रमणिका

१	वंदन	१४५
२	सभा	१५१
३	दोन कविता (कविता) ...	१५४
४	उस्ताद अहमदजान तिरखवा	१५५
५	बुंदेलखंडी मराठी	१५९
६	शिशिर ग्रीष्म (कविता) ...	१६३
७	राजाभाऊ	१६४
८	रक्त शब्द दुधारी तलवार (कविता)	१७०
९	वाणी विलास	१७१
१०	युगवाणीकडे परीक्षणार्थ...	१७५
११	स्वप्नदीप (कविता)	१७५
१२	आशादीप (कविता)	१७६
१३	विदर्भ साहित्य संघ—परीक्षांचा निकाल	१–२
१४	विदर्भ साहित्य संघ—परीक्षा समिति	३ ते ६
१५	संघवार्ता	१ ते ३

आमची नवीन प्रकाशनें

समाज शिक्षणाकरितां

(१) चांदणी. (२) कौंडिण्यपूर व सालबर्डीची यात्रा. (३) आमचे सण व उत्सव. (४) शिक्षकाचा मित्र. (५) भ्रमरगुंफा.

:: हायस्कूल्स, कॉलेजकरितां व इतर

(१) सुमन संचय बोध. (२) आग्न्याहून सुटका नोट्स, ले. प्र. ना. खोडे, एम्. ए. एल. एल. बी. (३) शरीर-विज्ञान व आरोग्यशास्त्र यांतील महत्वाची प्रश्नोत्तरें, ले. डॉ. गो. वि. कांग, एल. एम. पी. (४) विक्रीकला आणि विज्ञापन, ले. प्रा. पी. जे. पटवर्धन, [कॉमर्सच्या विद्यार्थ्यांकरितां]. (५) जनावरांचे रोग व त्यावरील उपाययोजना, ले. डॉ. ग. त्र्यं. गद्रे. (६) वृत्तालंकार आणि व्युत्पत्तीदीपिका [नवीन सुधारलेली आवृत्ति] ले. प्र. गो. निजसुर, M A B T.T.D. (London) [हायस्कूलकरितां].

प्रकाशक :— **ठाकूर आणि कंपनी लिमिटेड.**

अमरावती आकोला नागपूर.

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वंदन—

☆

आज आपण आपणांसाठी सर्वस्व वेंचलेल्या आपल्या दिवंगत राष्ट्रपित्याला त्याच्या जन्मदिनाच्या उत्सवांत अनन्यभावाने वंदन करीत आहोंत. आजवर आपण पुष्कळांना वंदन केलें, पुष्कळांनी आपल्यासाठी कांही ना कांही करण्याचा प्रयत्न केला पण आपल्या बापूंची करणी आणि त्यांच्या चरणीं आपलें हें वंदन वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्यासमोर आपण जितकें नतमस्तक होतों तेवढें एका परमेश्वराला सोडून कुणासमोरच आजवर झालों नाही.

कारण बापूंनी आमच्यासाठी काय करावयाचें बाकी ठेवलें आहे? मृत शरीरांत संजीवनीच्या साह्याने प्राण भरणाऱ्या व्यक्तीला जगाने नमन केलें, त्याला थोर म्हटलें! त्यांची थोरवी जर आपण मान्य केली तर या चाळीस कोटी जनतेच्या अफाट मानवसमुद्रांत—या आपल्या देशामध्ये चैतन्याचा संचार करून त्याच्या करवीं येवढ्या मोठ्या राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून देणारे बापू, त्यांचें थोरपण, त्यांचें कौशल्य, त्यांची साधना, त्यांची आत्मीयता मोजायला आपल्याजवळ माप नाही.

हें सर्व करायला त्यांच्याजवळ ईश्वराने साधनें तरी काय दिलीं होतीं! तर हाडांनी गुंफलेलें एक छोटेसें शरीर आणि सर्वांना आपलें मानणारें अंतःकरण! पण हें अंतःकरण जेव्हा आपल्यापुरता विचार सोडून दुसऱ्यांचाच विचार करतें तेव्हा तें सर्वसाक्षी आणि म्हणून सर्वव्यापक होतें.

तीस चाळीस वर्षांपूर्वी बापू दक्षिण ऑफ्रिकेंतून आले तेव्हा या देशाची मानगी त्यांनी ओळखली. त्यांना असें दिसून आलें की—"(१) या देशांत भूक फार माजली असून भीक मागतांना भल्या भल्यांना लाज वाटत नाही. धर्माच्या, देवाच्या, प्रतिष्ठेच्या नांवाखाली कुणीहि भीक मागतो. निढळाच्या घामाने आपली भाकरी मिळवून खाणाऱ्यांना येथे सुख आणि इज्जत नाही आणि दुसऱ्याच्या कष्टांवर आपलें पोट भरतांना कुणाला खंत वाटत नाही. (२) या देशांत धर्म मानला जातो पण धर्म आचरणांत आणण्याची, त्याला रोजच्या जीवनांत समाविष्ट करून घेण्याची निष्ठा आणि ताकद कुणांतच नाही. (३) या देशांत जाती आहेत, पण त्यांच्यात 'राम' नाही. दोन प्रमुख वर्ग येथे आहेत. एक श्रीमंत व सत्ताधीशांचा आणि दुसरा असंख्य दरिद्री

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जनतेचा: (४) या देशांत भीतीचें साम्राज्य आहे. कुणी एवढेसें दाबलें तरी लोक दबतात, अन्याय सहन करून चुप राहतात. साध्या शिवीचाहि प्रतिकार करीत नाहीत, उत्तराला प्रत्युत्तर देत नाहीत. आणि हें सर्व केवळ भीतीमुळें केवळ मुर्दाडपणामुळें !"

सबब या देशाची उन्नति जर करावयाची असेल तर आमूलाग्र बदल झाल्याशिवाय अन्य गति नाही, प्रचलित रूढ कल्पना आणि प्रतिष्ठा बदलविल्या-वाचून दुसरा मार्ग नाही. हें सर्व शोषण आणि भीति—आपल्या इच्छा आकांक्षांचें निर्दालन, बंद झालेंच पाहिजे !

हें अचूक निदान केल्यानंतर सर्वसाक्षी सूर्याने जेवढा वेळ त्यांच्या पदरांत टाकला त्याचा क्षण क्षण त्यांनी या देशाची स्थिति, या देशाची शक्ति, थोडक्यांत या देशाचा कायापालट करण्यांत वेंचला. त्यांनी आपलें उद्दिष्ट ठरविलें, त्यांनी आपल्या प्रतिपक्षाची ताकद अजमाविली; त्यांचीं शस्त्रें, त्यांचे मर्म जोखलें, आणि तीं सर्व साधनें व त्या सर्व शक्ति समूळ उपटून काढण्यासाठी आपली नवी शक्ति आणि नवीं साधनें वापरलीं. हीं साधनें म्हणजे गांधीजींनी या जगाला दिलेली अमोल देणगी, अतुल वरदान होय ! शत्रूच्या साधनांपेक्षा आपली साधनें प्रकाराने तींच पण प्रमाणाने मोठीं असलीं तरी तीं आपल्याला यश मिळवून देत नाहीत. शत्रूजवळ काष्ठभर अग्नि असला आणि आपल्याजवळ अग्नि-कुंड असलें तर संघर्षात दोन अग्नि फार तर एक होतील. विस्तव विझणार नाही, दाह कमी होणार नाही. "विश्व रागें झालें वन्हि, आपण सुखें व्हावें पाणी."—या संत वचनाचें मर्म बापूंनी घेतलें आणि शत्रूजवळील सर्वभक्षी अग्नि-कुंड विझविण्या-साठी पाण्याची योजना त्यांनी केली. हीच त्यांची साधनांच्या बाबतींतील अभूतपूर्व कुशलता होय !

असंख्य जनतेचा आणि विशेषत: दलित, श्रमिक, कष्टजीवी शेतकऱ्यांचा उद्धार करण्यासाठी बापूंनी आपले प्रतिपक्षी कोण आहेत हें अचूक ओळखलें. प्रतिपक्षी इंग्रज होते पण त्यांची काळजी बापूंना नव्हती. आपण आपल्या समर्थ शक्तिप्रभावाने एकदा त्यांना 'जा' म्हणून सांगितलें तर ते जातील, तोकडी पडत असलेली शक्ति वाढली पाहिजे, याबद्दल ते दृढनिश्चय होते. या देशांतील दु:ख, दारिद्र्य, दैन्य, गुलामी यांना इंग्रज कारणीभूत नव्हते; इंग्रजांना भिणारे आणि आप-ल्याला मात्र दरडावणारे आपलेच लोक कारणीभूत होते. लाख लाख सैनिकाच्या तुकड्या उभारून त्यांच्या सामर्थ्यावर या देशाचें कल्याण करण्याची ज्यांनी आशा बाळगली त्यांना बापूंनी त्यांच्या प्रयत्नाचा फोलपणा खडसावून पटवून दिला आणि जोंवर आपल्या सैन्याशी लढायला याच देशांतून आपण उभविलें त्यापेक्षा चौपट सैन्य ब्रिटिशांना उभें करतां येतें, तुमच्यांतूनच तुमच्या मानेवर सुरी चालवायला जोंवर त्यांना माणसें विकत घेता येतात तोंवर सशस्त्र क्रांतीची भीति ब्रिटिशांना वाटणें शक्य नाही हें त्यांनी इतक्या स्पष्टपणें जनतेला सांगितलें की त्यानंतर या देशाला गुलामींतून मुक्त करण्याचें अखिल भारतीय नेतृत्व त्यांनाच स्वीकारावें लागलें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४९
आक्टोबर

आणि समजा शस्त्राने ब्रिटिशांचा पाडाव करणें शक्य झालें तरी आपल्यापैकीच ज्यांनी ज्यानी जनतेचें शोषण चालविलें आहे त्यांच्याशी कसें लढणार? हाहि प्रश्नच होता. म्हणून त्यांनी कांही गोष्टी जनतेच्या मनावर आपल्या लाचारीचें निराकरण करण्यासाठी बिंबविण्याचा प्रयत्न केला :—

(१) येथील सत्ताधारी आणि श्रीमंत, गरिबांना कमी लेखतात. ते गरिबांच्या कष्टांवर सत्ता आणि धन बळकावून घेतले आहेत. हें बंद झालें पाहिजे. (२) येथील धर्मांत आणि ज्ञानांत गरिबांना शिरकाव नाही. गरीबांच्या अज्ञानावर येथील पंडित श्रीमतांना मदत करून स्वतः संभावित बनले आहेत. ती त्यांची संभाविती आपलें ज्ञान वाढवून खतम केली पाहिजे. म्हणजे गरीब, दलित जनतेने आपले कष्ट आपल्यासाठीच केले पाहिजेत, आपली स्थिति सुधारली पाहिजे आणि विरोधाचा प्रतिकार अहिंसक रीतीने व म्हणूनच हिंमतीने केला पाहिजे.

पण श्रीमंतांची ऐट खतम करायची म्हणजे काय? बापू म्हणत की आपल्या गरजासाठी आपण स्वतःवरच अवलंबून राहावें. श्रीमंतांना आणि त्यांच्या साधनांना दुरून नमस्कार करावा. आपण कष्ट करून आपल्या कष्टाची कमाई आपणच खावी. धनिक लोक मिलचा कपडा आपल्याला विकून जर धन जोडत असतील तर आपण आपला चरखा उचलावा, खादी वापरावी. श्रीमंत जर चवताळून चरखा हिसकायला आले तर प्राण गेला तरी बेहतर पण तो देऊ नये. इज्जतीने जगायचें असेल तर केव्हांना केव्हां मरण्याची तयारी ठेवायलाच हवी. आज मरण येऊं नये या भीतीने आपण मुरतुकडें जीवन जगतों. तेंच मरणाला भिववीत जगलों तर इंग्रजहि जातील, झगडा भांडण राहाणार नाही. संबंधहि टिकून राहातील!

अशी सोपी सोपी रीत त्यांनी सांगितली आणि सोपी साधनें त्यांनी वापरलीं. आपण आपल्या गरजा वाढविल्यामुळे जर श्रीमंत आपल्याला त्रास देण्याइतके माजले असतील तर आपल्या गरजा कमी केल्या पाहिजेत. आमचे थोर थोर पूर्वज, ज्यांना आम्ही देव नि ऋषी मानलें त्यांनी जर "भुकेला कोंडा आणि निजेला घोंडा" वापरून देवत्व व ऋषित्व मिळविलें तर आपणांला काय हरकत आहे? आपण साधेपणाने राहूं पण साधेपणाने म्हणजे भिकारपणाने नाही! गरजेच्या सगळ्या वस्तू वापरूं. फक्त गरजांना डोक्यावर बसूं देणार नाही. आज जग आपल्या गरजा इतक्या वाढवून बसलें आहे की गरजाच त्यांच्यावर आता कुरघोडी करतात. साधें उदाहरण सिनेमाचें घ्या. काम करून थकल्यावर जीवाला विरंगुळा वाटावा म्हणून खरें म्हणजे सिनेमा पाहावयाचा पण आपण आतां सिनेमासाठी आपली कामें देखील सोडून देतों आणि पोराच्या औषधाचे पैसेहि त्यांत खर्च करून टाकतों! सर्वच गोष्टीचें असें उलटें त्रांगडें या श्रीमंतांनी करून ठेवलें आहे. आधी अन्न आणि नंतर भूक असें यांनी अर्थशास्त्र बसविलें आहे. कारण अन्न यांच्या हातीं आहे. भूक थोडीच आहे! आपण असा मूर्खपणा करू नये. आधी भुकेसाठी कष्ट—मग येईल अन्न आपोआप, जातें कुठे!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्या देशांत श्रीमंतीचें, अधिकाराचें, प्रतिष्ठेचें मुख्य लक्षण म्हणजे शरीरश्रम न करणें हें होऊन बसलें आहे. जो कष्ट न करतां आयतें बोकणतो तो श्रेष्ठ आणि जो कष्ट करतो तो कनिष्ट—ही विचित्र समजूत आपल्यामध्यें शेकडों वर्षांपासून रूजली आहे. जो उटतो तो आयतेंच पाहातो! त्यामुळे मजूर आणि शेतकरीहि बाबू बनूं पाहातात आणि कानावर कलम ठेवून पानपट्टी चघळण्याचें ध्येय ठेवतात. असें झाल्याने कांही बिचारे जन्मभर कष्टच उपसून मरतात व कांही नुसते मजा मारतात. पण कष्टाशिवाय कमाई नाही. बापूजींनी यासाटीच सांगितलें की श्रम कोणतेच वाईट नाहीत. जीं वाईटसाईट पण आवश्यक कामें आपलीं आपल्याला करण्यांत कमीपणा वाटतो, घाण वाटते, तीं दुसऱ्याला सांगू जाण्यांत पाप आहे. त्यामुळे भंगी, हरिजन अशा जातीच्या जाती गुराढोरांचें जगणें जगत आहेत. आपल्या खेड्याच्या भाषेंत याला 'चोट्टे खुशाली' म्हणतात. यास्तव त्यांनी स्वत: भंगी काम केलें नी करायला लावलें. शरीरश्रम रोज करण्याची प्रतिज्ञा केली व गरीबांची आणि दलितांची, स्त्रियांची इज्जत वाढविली! त्यांचें अनुकरण केलें तर कुणीच नीच राहाणार नाही आणि बाबू बनण्याची कुणाची इच्छाहि होणार नाही!

गरीबांना आणि सगळ्या जनतेला चांगलें लढतां यावें म्हणून त्यांनी त्यांच्या बद्दलच्या अतिप्रेमाने कळवळूनच अहिंसेचें शस्त्र शोधून काढलें आणि एक खंडतुल्य देश स्वतंत्र करण्याच्या कामी तें वापरून यशस्वी करून दाखविलें. जनतेचें राज्य कायम व्हावें अशी ज्यांची इच्छा असेल त्यांना अहिंसेशिवाय दुसरें साधन नाही. कारण हिंसा हें जनतेचें हत्यार नव्हे! तें सर्वांना योग्य रीतीने वापरणें परवडत नाही. हिंसेंत योग्य कसलें नी अयोग्य कसलें! शस्त्र वापरणाराला इतराला मारीत आपल्या इच्छेविरुद्ध जगावें लागतें आणि इच्छे-विरुद्ध मरावें लागतें. दुसऱ्याला मारून स्वत: जगण्याची राक्षसबुद्धि ठेवणाराच हिंसेचें तत्त्वज्ञान सांगू शकतो. पण ही माणसाची बुद्धि नव्हे, त्याची ती कृति नव्हे, त्याचा तो स्वभाव नव्हे! नित्यपरिचयाचीं उदाहरणें आपल्याला येथे घेतां येतील; "आपण माणसामाणसाची लढाई पाहिली आहे. हजार दोनहजार माणसें कांही व्यवस्थेने एकत्र जमून दुसऱ्या हजार दोन हजारांशी लढत घेतांना आपण पाहिलें आहे, पण ज्या ईश्वराने आम्हांला निर्माण केलें त्यानेच निर्माण केलेल्या आणि आपण आपल्यापेक्षा कनिष्ठ मानलेल्या, त्यांची नांवें शिवीसाटी वापरलेल्या पशुपक्षांना मात्र आपण लढतांना पाहिलें नाही. हजार दोन हजार कावळे, हजार दोन हजार लांडगे, हजार दोन हजार सिंह दुसऱ्या दोन हजारांशी एकजुटीने लढलेले न आपण कधी देखिलें न कधी ऐकिलें!" म्हणजे माणसापेक्षा पशु बरा असें म्हणावयाचें काय? माणसाला एकत्र खेळीमेळीने समाजांत राहावयाचें असतें आणि असें राहणें सर्वांना शक्य व्हावें म्हणूनच आम्ही इतरांना मारतों असेंच हिंसेवाल्यांना सांगावें लागतें. त्याशिवाय उगीच मरायला कोण तयार होईल? कांही लोक जसे संवयीने विष पचवूं शकतात तसे कांही लोक तरवार घेऊन जगूं शकतात,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सर्व नव्हे ! दुसरें उदाहरण घेऊं ! दोन वीर स्वार्थासाठी तरवारींने समोरासमोर लढत आहेत. समजा त्यापैकी एकाची तरवार तुटून पडली तर त्या वीरासमोर दोनच मार्ग मोकळे आहेत. एकतर पळून जाऊन जगण्याचा प्रयत्न करणें किंवा शत्रूचा वार छातीवर घेऊन मरणाची तयारी करणें ! पळून जाणें नामर्दाचें लक्षण समजलें गेल्यामुळे वीराला मरणाची तयारीच करणें येतें ! बापूंचें म्हणणें असें की आपल्या आणि इतरांच्या हितासाठी मरणाची आधीच तयारी केली की तरवारीचें, कृत्रिम कवायतीचें आणि इतरांना भिवतीत समाजद्रोह करण्याचें कामच उरत नाही. दुसऱ्याचें मरण चिंतिलें की दुसरा माझें मरण चिंतील. दुसऱ्याचें अहित मीं केलें की दुसरा माझें अहित करील. तेंच मी दुसऱ्याचें वैरें केलें की तो माझें वैरें करील. वैरें किंवा वाईट करणारा एकटा असतो. पण त्याचें वैरें किंवा वाईट करणारे अनेक असतात. सबब मीं माझ्या एका मुखाने आणि दोन हातांनी दुसऱ्याचें कल्याण करून त्याच्या सुखाची इच्छा केली तर हजारों लाखों मुखें व हात व्याकरणाच्या नियमाप्रमाणे माझें भलें करतील ! हिशेब अगदी सरळ आहे ! हें गांधीजीच्या अहिंसेचें सोप्यांत सोपें मर्म आहे. तें त्यांनी आचरणांत आणून दाखविलें आणि म्हणूनच ज्या वेळी नोआखलींत पिस्तुलधारी माणसालाहि जाणें अशक्य होतें त्यावेळी तेथे जाण्याची त्यांना हिंमत आली. त्यांनी कधी कुणाचें अहित चिंतिलें नाही, कुणाशी शत्रुत्व केलें नाही. इंग्रजांना त्यांनी आपले मित्र मानलें. फक्त त्यांना त्यांच्या भल्यासाठी हिंदुस्थानांतून जायला सांगितलें आणि त्यासाठी प्राण देण्याची तयारी केली. श्रीमंतांनाहि ते आपले मानीत. फक्त आपली संपत्ति दरिद्रि नारायणाला अर्पण करा नाहीतर तुमचा मोटा वाखा होईल असें त्यांना सांगत. आज इंग्रज गेले ! श्रीमंतांनाहि आपलें भलें कळत असेल तर त्यांनाहि बापूंनें ऐकण्यावाचून गत्यंतर नाही.

दुसऱ्याचें भलें इच्छिण्यासाठी बुद्धि हवी. म्हणून शिक्षण हवें ! जनता सज्ञान झाली म्हणजे पंडितांची प्रतिष्ठा आणि त्यांचें शोषण आपोआप थांबेल ! तीस कोटी लोकांच्या शिक्षणाचा प्रश्न सोपा नव्हे ! म्हणून गरीबांना आपली भाकरीहि मिळाली पाहिजे आणि त्यांतूनच शिक्षणहि मिळालें पाहिजे. गरजेने ते मन लावून शिकतील, तें कामीं येईल. आज जे विचारवंत आहेत ते श्रम करीत नाहीत व जे श्रमिक आहेत त्यांच्यांत विचार करण्याची कुवत नाही. ही अनावस्था श्रमिक श्रमाबरोबरच शिकले म्हणजे दूर होईल व पंडित नीं श्रीमंत रस्त्यावर येतील; गरीबांना नुसतें जगण्यासाठी जी ढोरमेहनत करावी लागते ती करावी लागणार नाही. त्यांची " वर्धा योजना " या साठीच आहे.

माणूस स्वत: पुरतें न पाहातां दुसऱ्याला घेऊन चालूं लागला म्हणजे त्याच्यात माणुसकी येईल. आज सर्व वस्तू महाग झाल्या आहेत. फक्त माणूस आणि माणसाने पिचविलेल्या खालच्या जाती नि स्त्रिया अतीव स्वस्त झाल्या आहेत. लढाईच्या जमान्यांत एक गाडीभरून माती १६ रू. ला मिळत असे पण तोफेच्या तोंडी द्यावयाला जेव्हा सरकारची माणसें माणसांच्या बाजारांत माणसें विकत

घ्यायला जात तेव्हा त्यांना ११।। रू. त्या भावाने हजारो माणसें मिळत. साधेपणाने, अहिंसेने, आपल्या इज्जतीने राहाण्याचें ठरविलें आणि त्यासाठी बापूंनी सांगितल्याप्रमाणे प्रसंगीं मरणाचीहि तयारी केली की माणूस असा स्वस्तांत मिळणार नाही. लाखमोलाचा जीव असा कवडीमोलाने कुणी विकत घेऊं शकणार नाही आणि माणुसकीचें मोल वाढेल!

असे आमचे बापू म्हणजें जगाचे महात्मा गांधी होते! गरीबांचा तांब्याचा पैसा त्यांना सोन्याच्या तुकड्यासारखा वाटे. गरीबांचे श्रम त्यांना स्वर्ग मोलाचे वाटत. आपल्या देशाची ही जनता अगदी निर्जीव दगडामातीसारखी पडली होती; कुणीहि यावें नि तुडवून घ्यावें––तिला पावसाने भिजवावें, वाऱ्याने निजवावें, थंडीने झोडपावें, उन्हाने जाळावें, माणसाने लाथाडावें! त्या जनतेच्या जवळ बापू गेले. तिला त्यांनी आपलें म्हटलें आणि आपल्या साधनांच्या परिसाने तिचें त्यांनी सोनें केलें! आज ते नाहीत हें आठवून दैवाने चामड्यांत फसविलेले हे आमचे डोळे आपल्या गळतीने धरती ओली करीत आहेत. असे आमचे बापू–असा हा अभूतपूर्व पुरुष, बोलेन तें करीन आणि करीन तें चांगलें करीन अशा प्रतिज्ञेने अखिल मानव जातींतील दलितासाठी ज्याने पन्नास वर्षेपर्यंत झगडा केला–– "नाशिवंत देह झाला जरी भंग, तरी कीर्तन रंग सोडूं नये"––या निष्ठेने व मर्दाच्या छातीने जो दरिद्रनारायणाची लय लावून गेला त्या आमच्या देवतास्वरूप, अतुलपराक्रमी, युगायुगांतून एकादवेळ संभविणाऱ्या बापूंना आमचे प्रणाम!

आजवर पुष्कळ थोर लोक होऊन गेले! कुणी संत झाले, कुणी राजे झाले, कुणी जगज्जेते झाले, कुणी देवर्षि झाले, कुणी ब्रह्मर्षि झाले पण ज्याला आम्ही पूर्णतया आपला, अगदी आमच्यांतला आणि फक्त आमच्यासाठी असें म्हणूं शकत होतों–ज्याच्या हास्यातून आम्हांला आशा मिळत होती, ज्याच्या दृष्टींतून आम्हांला दिलासा मिळत होता, ज्याच्या करणींतून आम्हांला जीवन मिळत होतें असा हा एकमेवाद्वितीय आमचा राष्ट्रपिता, या तेहतीस कोटी जनतेचा कल्याण-कामी आमच्यासाठीच जगला, आमच्यासाठीच खपला आणि आमच्यासाठीच गेला––!

त्याच्या वाणीला, त्याच्या करणीला त्याच्या स्मृतीला आमचे कोटि कोटि प्रणाम! गांधीजी गेले, गांधीजी अमर आहेत!*

---

* ऑल इंडिया रेडियो, नागपूरच्या सौजन्याने. (ता. ३-१०-४८ रोजीं दिलेलें भाषण!)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४९
आक्टोबर

सभा

★

मोर—इथे कशाला आपण जमलों, मित्रांनो, हें, विदित तुम्हां
चिमणाबाई कार्यवाह ह्या करतिल सुरु आतां कथना

चिमणाबाई—मयुरसभापति, प्रिय बंधूगण, आपण जमलों कां येथे!
अपराधी जो मनुज आपला, न्याय तयाला द्यायातें.
जगायचा मनुजातें नाही हक्क मुळी अवनीवरती
देवाने तर अमुच्यासाठी निर्मियली अवनी होती.
उपटसुंभ ये कानामागुन तिखट परी हा झालेला
जिरवूं त्याची खास निश्चयें जूट करून या वेळेला.
व्यर्थ भांडणें अपुलीं टाकुन एक जरी झालें सारे
पाला झाडाचा हा कोण्या मनुज! एक व्हा तर सारे.
एके ठायीं मिळुन करावा विचार सकलांनी आज
म्हणुन घेतली सभा आजची, मानवनिर्दाळण काज.'

[चिवचिवाट]

मोर...चिमणाबाई अतां बोलल्या, कार्य तुम्हांला कळलेलें
परममित्र कावळे सांगतिल, परमदु:ख आतां अपुलें.

मुंगुस...(आपल्याशींच पुटपुटत)
शोभेचे अध्यक्ष पहा हे, कार्यवाहिका नवलाची
काय व्हायचें कार्य? वृथा हें...

घूस...बडबड रे करसी कसची?

मुंगुस...कुठे? कायबा? कांहींच नाही...

घूस...ओंठ कसे मग तव हलती?

मुंगुस...एवढेंच ना? अंगे पिसाटे, खोड असे जन्माची ती.

कावळा...जरि मी काळा असे कावळा, केवळ काळें मम अंग
परि बगळ्यापरि शुभ्र मनुज जरि, काळा हृदयाचा रंग.

मोर...बगळ्याचें कां नांव घेसि तूं? परस्परांचें भांडण ना?
निष्ठुर, कपटी, दुष्ट मानवा न्याय द्यावया जमलों ना!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बगळा...सदा करितसे असें कावळा, शुभ्र म्हणुन हिणवी मातें
देवानें हा रंग दिलेला, नच रंगविलें मीं मातें.
मोर...कशास घेसी उगा मनावर बोल तयाचे ? वेडा तो.
मनुजावर आरोप कांहि कां ?...
बगळा...हो तर, मी आतां कथितों
मला बोलती ढोंगी, स्वार्थी, दांभिक, नाही नाही तें
कशास यांचें भलतेंसलतें उगा ऐकुनी घ्यायाचें !
मनुज सकल हे कपटी, यांच्या स्वार्थाला बंधन नुरलें
माणुसकी तर कधींच मेली, मढें तियेचें हें उरलें.
दांभिक मी...
कोल्हा...नच तूं, पदवी ती, मनुज खरोखर मज देई
धूर्तपणाच्या कथा माझिया वाचल्या न कां तूं कांही ?
महामूर्ख तो इसाप कोणी कधींतरी होऊन गेला
नाना लीला माझ्या लिहुनी खोट्या, तो मोटा झाला.
मर रानामधिं सगळ्यापुढतीं भिकार पुस्तक जाळूं तें
होळी भवतीं फेर धरुनिया गाऊं आनंदी गीतें.
मोर----पुरें तुझें रे, तोंड उघडतां सदाचेंच उघडें राही
ताळतंत्र ना तुला कशाचा वेळेचें भानच नाही.
काय मावशी ? तूंहि सांगना----
मांजर---- मनुजांतच मी वावरते
अन्नावरती, प्रेमावरती, दयेवरी त्यांच्या जगते
भलतेंसलतें, खोटेंनाटें कसें बोलुं मी ?----
उंदीर---- मिनुताई----
खात असे ही आम्हां सकलां, बघा कशी फुगली बाई !
दूध हिला मिळतसे, घ्यावया इवलाले अमुचे प्राण.
दोष हिला ना, या मनुजातें शेपुट त्याच्या करिं जाण
मांजर----खरें वदसि तूं उंदिरभाऊ, तो सांगे, मी तुज खातें.
सांग माझिया माथीं कैसें खापर तूं याचें फुटतें ?
उंदीर----नको आपुलें भांडण येथें----
मोर---- रहा तुम्ही दोघेंहि उगे
अजुन कुणाला बोलायाचें ?----
गाढव---- मला.
माकड---- मला.
मांजर---- हो करा पुरे
आस्वल----बोलूं या सगळ्यांना, अमुचे हक्क आम्हाला भोगूं द्या.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वेशीवर गान्हाणें अमुचें आज अम्हांला टांगू द्या.
न्रिमणाताई----शांत, शांत, घ्या धीर दमानें मनुजापरि हा गोंधळ कां!
मोर...खुशाल बोला ज्यांस बोलणें, वागणूक ही शोभे कां ?
गाढव...निमुटपणें मी सहन करितसें, अपमानाचें दुःख सदा
जसेंजसें मी सहन करतसे, वाढत जाते मम विपदा.
कोल्हा...खराच गाढव, हाण दुगाण्या तोंडावरती दोन तरी
दांत पडुनिया, वळवळ राहिल बोळक्याचि, बघ मजा तरी.
मोर...असलें कांहीं करूं नको तूं, करायचें तें मिळुन करूं
पापी मानव दंडुन आपण अन्यायाचा नाश करूं.
माकड...दरवेशी तो दारोदारीं पोटार्थी मज मिरवतसे
अमुच्या जीवावरी जाळुनी पोट आमुचें करी हंसें.
आस्वल...असेंच माझें, गिरिकंदरीं जरि लपूनियां आम्हीं बसतों
तिथून ओढुन धूड नाचवी लाज आमुची तो विकतो
(थोडा वेळ शांतता)
मोर...अजुन कुणाला बोलायाचें ?
आवाज १ मला, मला
२ हो करा पुरे
३ सभा आटपा घरीं न तुमच्या असती कां बायापोरें ?
४ लागू द्या हो वेळ कितीहि मनुजाला देऊं न्याय
राहु द्यायचा डोईवरती अन्यायाचा कां पाय ?
मोर···हत्ति यायचा होता ना हो ! आपण सारे लहानसे
आधिच मातें वाघ बोलला, " सभेवरी विश्वास नसे "
कावळा···घोड्याला मी म्हटलें होतें, परी इमानी तो खासा,
'नाहीं' वदला, संतापुन मी व्रणांत खुपसे चोंच कसा !
त्याच जातिचें श्वान तयाला पिसें लाविलें मी खासें
बसला भुंकत दारावरती, रट्टे खाई जोराचे
दार सोडिना तरीहि पठ्ठा, कुऱ्हाडिचा दांडा झाला
काळचि गोता, नको इथें, तो जिवंत बरिही मेलेला.
मोर...आज नको घ्यायाला निर्णय, सगळ्यांना आणूं यंथे
मोठ्याचें बळ हवें आपणा, त्याविण कां कांही जुळतें ?
गजराजाते, वनराजाते, अश्वाते मी भेटीन
आणि सभेची तारिख तुम्हा सकलांना मी कळवीन
धीर धरा तोंवरती सारे, अविचाराची गोष्ट नको.
उंदीर...चला तोंवरी जगायची मग उगाच आम्हां धास्त नको.

—गो. रा. दोडके

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोन कविता—

फिदा जाहली अशी साथीवर—
—तगड्या लागे कीं नाचाया,
मध्यरात्रिच्या एकांतामधिं
माझ्या खोलीमध्ये सुरैय्या.
डफ्फर साल्या विद्यार्थ्याचा
कान धरी या तुकाराम पण;
कठीण मर्म इतकें, वाटे
उठून जावें कीं किंचाळुन,—
—"फुटो ती पाटी हो। तुटो ती पेन्सिल
श्री गणेशा........गेलं। चुलीमध्ये.॥
नाशवंत देह। झाला जरी भग्न
बाहुलीचे लग्न। सोडूं नये.।

*

देवाची हो, निरुपयोगिता
सिद्ध मलाहि करतां येते
कठीण असली बायसिकल् तरी
ट्रायसिकलवर बसतां येतें.
बायसिकल्हि शिकला 'बाळ्या'
येई जगाची चक्कर मारुन,
बाळासाहेबांचा आला
'किर्लोस्कर' मधिं फोटो छापुन.
जिच्या पुजेची साखर खाउन
पोर एवढं गोड निपजलं
आजीला त्या नादामधिं पण
सायकलंच्या तें हाय! विसरलं.

वसंत हजरनीस.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उस्ताद अहमदजान तिरखवा.

ले. मधुकर श्री. मंगरूळकर, ॲडव्होकेट.

तबला नवाझ उस्ताद अहमदजान तिरखवा साहेब यांना मीं पाहिलें नव्हतें तेव्हांची गोष्ट! त्यांचे तबला वादनाचे कार्यक्रम, नुकतेच नभोवाणीवरून व्हायला सुरवात झाली होती. गंधर्व कंपनी सोडल्यानंतर आणि रामपूरच्या नबाब साहेबांच्या दरबारीं त्यांचा प्रवेश झाल्यापासून, तिरखवांचे कार्यक्रम लोकांना पारखे झाले होते. पुण्यामुंबईच्या लोकांना एखादे वेळी तरी संधी येत असेल, पण नागपूरच्या नशीबीं तेवढेंहि भाग्य नाही. नागपूर महाराष्ट्राच्या सायडिंगवर पडलेलें. बालगंधर्व आपल्या ऐन उमेदीच्या काळी नागपूरला आलेले होते. त्यावेळी आमचे पाय पाळण्यांत दिसत असतील. आम्हांला समज आल्यापासून कशाला आम्हांला या व्यक्ति पाहायला आणि ऐकायला मिळतात असे वाटे! त्यामुळे प्रथम त्यांचा कार्यक्रम जाहीर झाला त्यावेळी रेडिओवाल्याची करूणा भाकतां भाकतां आमच्या नाकीं नऊ आले. तेव्हा नागपुरांत रेडिओ कमी होते. पानाच्या ठेल्यावरून तर नव्हतेच. तिरखवांचा पहिला कार्यक्रम मीं श्री. नायकांच्या घरीं ऐकला. म्हणजे अर्थात् त्यांच्या रेडिओवर. माझ्याप्रमाणे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ संगीतज्ञ, लखनौ विद्यापीठाचे तबलावादनांत पदवी मिळविलेले वादक इत्यादि मंडळी होती. ती खोली रसिक मंडळींनी पूर्णपणे भरली होती. समोर स्टुलावर रेडिओ होता. आमची सगळ्यांची भावना ही कीं खाँसाहेब तबला–डग्गा घेऊन समोर वाट पाहात आहेत. विड्यांचें तबक बैटकीची शोभा वाढवीत होतें. आता फक्त उशीर होता सायंकाळचे साडेसाहा वाजण्याचा—आणखी फक्त पांचच मिनिटांनी साडेसाहा वाजणार होते आणि खाँ साहेबांची व आमची भेट होणार होती.

...झालें! अखेर साडेसाहा वाजले! सगळ्यांचे श्वास जणुं एक क्षण थांबले. परिचारकाची धीर गंभीर वाणी ऐकूं येऊं लागली.

"—अब रामपूर दरबारके उस्ताद अहमदजान तिरखवा साहब तबलेपर दिल्लीबाज बजायेंगे..." आणि ही ओळ संपते न संपते तोच—एखाद्या शाहीराने आपल्या डफावर थाप मारावी त्याप्रमाणे कडाड्कन् थाप वाजली. आमच्या अंगावर रोमांच उठले. लखकन् वीज चमकावी आणि लगेच कानठाळ्या बसणारा आवाज व्हावा तसें कणखर कसब त्या थापेंत होतें. तबल्याची आस सेकंद दोन सेकंद हवेंत घुमत होती. तबल्याचें एखादें घर नीट सुरांत लागलें नाही तर ती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नादलहरी एखाद्या चंचल छोकरीप्रमाणे उनाडक्या करीत उड्या मारीत जाते— पण सर्व नीट सुरांत असलें म्हणजे तीच नादलहरी दिलांत सुरी आरपार खुपसून देते. ती थाप ऐकतांच आमच्यांतील वादक उद्गारले, "वा—वा!!" साऱ्या उमरभर केलेल्या कलेची तपश्चर्या...घरंदाजपणाची पुण्याई...हाताचें वजन... सारें कांही त्या मोकळ्या सुरेल थापेंत होतें. गवैयाने खुल्या आवाजांत तारषड्ज लावला, म्हणजे स्निग्धकंठातून घन्योद्गार बाहेर पडतात, त्याप्रमाणे त्या क्षणीं झालें. डफाची थाप ऐकतांच मावळ्यांनी आपले मुंडासें सावरून पायावर नीट बसावें तसें आम्ही सावध झालों. नजरा रेडिओवर खिळल्या होत्या आणि कान...? रेडिओमार्गे दिल्ली स्टुडिओच्या त्या खोलींत जाऊन पोचले होते...जणु आम्हांला पाहूनच त्यांनी खुल्या आवाजांत डग्गा घुमविला...'धिन्...'

'वा' 'वा' पुन्हा आवाज निनादले. मघाच्याच स्वरांचा प्रतिध्वनि ! एखाद्या मोठ्या पितळी गंजात पाणी भरलेलें असावें आणि दुसऱ्या भांड्याचा धक्का लागतांच त्या भांड्याचा नाद जसा व्हावा तसा तो आवाज त्या खोलीला भारता झाला. गुलाम साबीरांनी भरकन् सारंगीवर तान घेऊन, त्या 'धिन्'वर स्पर्श केला अन् लहरा पकडला. ती दोन वाद्यांची मिलावण इतकी गोड होती, कीं जणु आखाड्यांत उतरण्यापूर्वी दोन कुस्तीगीरांनीं एकमेकांचा हस्त स्पर्श करून सलामी घेतली होती.

ठेका सुरू झाला. नर्तकीने आहिस्ता पावलें टाकीत भूमि आक्रमण करीत जावी त्याप्रमाणे धिम्या लयींत ठेका सुरू होता. जणु दोघेहि वादक एकमेकांच्या सामर्थ्याचा कानोसा घेऊन बघत होते. इतक्यांत...

पावसाचा एक एक थेंब येतां येतां एकाएकी वळवाच्या पावसाची सर यावी, आणि गारांची तडित्-वृष्टि सुरू व्हावी तसें झालें. ताड्-ताड्-ताड्-ताड् !! एका मागून एक अग्नि-स्फुलिंग उडत होते जणु !! एका दीर्घ परणाला सुरवात झाली होती. किती आवर्तनाचें तें परण असेल हें आमच्या पैकी कुणालाही सांगतां आलें नाही.

हळुहळु सारे प्रेक्षक एक एक वीत पुढें सरकूं लागले होते. कारण त्या परणाच्या बोलांत एक नाविन्य प्रतीत होत होतें. गोरखनाथाने मृदंग वाजवीत असतांना 'चलो मच्छिंदर गोरख आया' असे बोल काढले होते, त्याप्रमाणे एक नवीनच अविष्कार त्या बोलांतून प्रतीत होत होता. विजेचा पंखा खूप वेगाने गर्‌गर् फिरत रहावा तसें परण चालू होतें. आणि हळूच मूळ लयीचे 'धाधिं धिंधा-धाधिंधिंधा'...हे शब्द साकार होऊन पुढें येऊ लागले होते. आम्हांला प्रश्न पडला की खाँ साहेबांनी मध्येच हा "ठेकेदार" कशाला घेतला साथीला ! आमच्या पदवीधर वादकांनी अधिकार बोलाने निर्णय दिला की मूळ लय सुद्धां नये म्हणून टाळी वाजविण्याऐवजी साथीला ठेकेदार घेतला आहे. मला तें समर्थन पटेना. वाटलें हें जर खरें असलें तर खाँ साहेबांचा मोठेपणा तो कसला ? कीं...! त्यापेक्षा आपलें अज्ञान दिसूं नये म्हणून चूप राहिलेलें काय वाईट...!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४९
आक्टोबर

पण इतक्यांत एक सुरेख तिया घेऊन त्यांनी परत संपवलें आणि समेवर जोरदार थाप घेऊन मूळ ठेका धरला तेव्हा साऱ्यांना कळलें की दोन्ही 'ठेकेदार' एकच आहेत अन् ते म्हणजे खाँ साहेब...!! आम्ही सगळे आश्चर्याने थक्क झालों. उजव्या हाताच्या चार बोटांपैकी तीन बोटांनी लयीची असीम परिसीमा गांठायची आणि चवथ्या-म्हणजे आंगठ्या जवळच्या बोटाने मूळ लय धरून ठेवायची अन् मूळ ठेका वाजवायचा आणि तो अशा डौलांत की जाणत्या जागत्या लोकांनाहि वाटावें, की मूळ ठेका धरणारा वेगळा आणि स्वतंत्र वाजविणारा वेगळा. चपळ प्रकृतीच्या लहान मुलाला, एखाद्या वडिलधाऱ्या माणसाने बोट धरून नीट रस्त्यांतून न्यावें, तसा तो प्रकार मला वाटला. अर्धा तास केव्हा संपला हें आम्हांला कळलें देखील नाही. तबल्यावर जसें उजव्या हाताचें असामान्य प्रभुत्व तसेंच डग्यावर डाव्या हाताचें ! उजव्यापेक्षा डावा कोणत्याहि अर्थाने कमी नाही. उजव्या हाताने उंच पंचम स्वरांत गोष्ट सांगावी, अन् डाव्या हाताने धीर गंभीर स्वरांत हुंकार देत, त्या गोष्टीला पुढे चालना द्यावी, असें तें अप्रतिम वादन ! कार्यक्रम संपला आणि आम्ही भानावर आलों. श्री. नायकांच्या माडींत कोपऱ्यांत वाटी कुरतडलेला एक जुनाट, भिरड लागलेला तबला पडला होता. त्याच्याबद्दल देखील आमचा आदर दुणावला. मेलेल्या चामड्यांतून इतकें जिवंत संगीत बाहेर पडूं शकतें यावर विश्वास बसेना !

खाँ साहेबांची तयारी अप्रतिम आहे. पण माझ्या सारख्याने अप्रतिम तरी कोणत्या निकषाने म्हणावें ! तो दरिया अथांग आहे. आपण त्या पाण्याचे दोन थेंब आपल्या डोळ्याला लावून नम्र व्हावें इतकेंच आहे आपल्या हातीं !!

त्यानंतर खाँ साहेबांना अनेकवार नभोवाणीवरून ऐकलें आहे. नव-नवोन्मेषशालिनी प्रतिभेसारखी त्यांची कला प्रत्येक वेळा नव्या थाटांतच दृष्टीस पडत आहे.

खाँसाहेब 'स्वतंत्र वाजा'मध्ये जेवढे तयार आहेत तेवढेच साथीला देखील. निदान मला तरी तसें वाटलें. त्यांच्यावर लिहिल्या गेलेल्या लेखांत, मला तरी पूर्वग्रहच दिसून आला. कारण तीन चार वर्षांपूर्वी मुंबई केंद्राहून त्यांनी केलेली बालगंधर्वांची साथ लक्षांत आहे. ' वद जाऊं कुणाला शरण ' या करुणरसात्मक गाण्याची रंगत वाढविण्यास नारायणरावांचा गळा जेवढा जबाबदार आहे तेवढीच खाँसाहेबांची साथहि...'. " प्रार्थिलें कथुनि दुःख मनिचें " ही ओळ आळवीत असतां, जणुं डग्यांतून दुःखाचे कढ निघत होते. रत्नप्रभेच्या कांही रेकॉर्डस-मध्येहि त्यांनी साथ केली आहे.

हें निराकार स्वप्न कधी काळीं हरिश्चंद्राचें स्वप्न ठरेल ही भविष्यवाणी मला कधीहि खरी वाटली नसती. पण नागपूर नभोवाणीच्या कृपेमुळे त्यांना प्रत्यक्ष पाहाण्याचा आणि ऐकण्याचा योग आला. ' पुंडलिका भेटी परब्रह्म ' आलें. सेवासदनच्या हॉलमध्ये त्यांचा स्वतंत्र कार्यक्रम ऐकला. तीन तास भरपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मेजवानी झाली. हार्मोनियमपटु श्री. गोविंदराव टेंबे यांचेसारखे रसिक त्या बैठकीस हाजर होते. मग ती बैठक रंगणार नाही असें कसें होईल ! नागपूरचे तबलावादनपटु कै. बळिरामपंत पंडे यांचा शिष्यवर्ग त्यांचे अवती भंवती होता. हॉल चिक्कार भरला होता. पण त्याची त्यांना दखल नव्हती. कारण डोळे लावून हाताची कारवाई सुरू झाली, म्हणजे मग नादब्रह्म लागत असे. सारंगीवाला एखादे वेळी कणसुरा झाला किंवा क्वचित लयींत लथडला म्हणजे त्यांनी हळूंच म्हणावें—

"अच्छे चलना भैय्या···" पुन्हा आपले घिडनग् घिडनग् तक् तक् घिडनग् तक् घिडनग् घिडनग्...चालू!···घिरकिडचे तरी किती प्रकार म्हणून सांगूं !···एक बोल सरळ वाजवावा अन् लगेच तो पुन्हा उलटा···दुपटींत चौपटींत आठपटींत···नवा बोल किंवा परण सुरू करण्यापूर्वी ते एखाद्या शागिर्दाकडे डोळा हळूंच उघडा करून म्हणत—

"सुनलो बेटा ! फिर नहीं मिलेगी ये बात"···सृष्टि निर्माणकर्त्या नियंत्याला आपण सुंदर सृष्टि निर्माण केली याचा गौरव वाटला तर त्यांत चुकलें कुठे ?

तिरखवांना तीन घराण्यांचा बाज पूर्ण याद आहे. एक घराणेंच पूर्णांशाने हस्तगत असणें म्हणजे फार मोठी गोष्ट समजली जाते. मग तीन घराण्यांचे ज्ञान—! आपल्या कल्पनेच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे.

अलिकडचा खाँ साहेबाचा कार्यक्रम अप्रातिम झाला असेल तर तो श्रीमंत बाबूराव देशमुखाकडचा. अर्थात्च तिथे सगळ्यांना वाव नसतो. दुसऱ्या रामपूरच्या नबाबाचा दरबारच जणु. बाबूरावासारख्या रसिकापुढे त्या रात्रीं आपल्या कलेची त्यांनी परमावधी केली. नारायणराव राजहंसाचे आणि बाबूरावांचे संबंध लक्षांत घेऊनच की काय खाँसाहेब मनांत गहिंवरले. त्यांना ते जुने दिवस आठवले की जेव्हा पॅरिसचे पडदे रंगभूमिवर झळकत होते आणि महाराष्ट्राच्या महिलांच्या फॅशनप्लेटस् सुभद्रेच्या आणि भामिनीच्या वेषांवरून ठरत होत्या. खाँ साहेब जणु त्या दिवसांतच होते. बेभान होऊन त्यांनी स्वतःच एक लेकर मारली—

"नरवर कृष्णासमान..." आणि लगेच त्या मूक पद्याची साथ...! वाचकांनी तें समाधान कल्पनेनेच जाणावें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बुंदेलखंडी मराठी

प्रा. दा. ल. अडोणी,
सागर विश्वविद्यालय.

★

भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाला चालना मिळाल्यापासून सामान्यत: आणि 'डांग'च्या प्रकरणाचा डिंडिम वाजूं लागल्यानंतर विशेषत: सीमाप्रदेशावरील मराठी भाषेच्या स्थितीकडे व घटनेकडे महाराष्ट्रांतील लोकांचें लक्ष आकर्षिल्या गेलें. सीमारेषेपासून दूर, हिंदी भाषाभाषी प्रदेशामध्ये, बेरांप्रमाणे गेल्या दोन-अडीचशे वर्षांपासून महाराष्ट्रीयांनी ज्या वसाहती केल्या त्यांत बुंदेलखंडांतील झांशी, सागर (दमो), जबलपूर, हुशंगाबाद (नरसिंगपूर) इत्यादि जिल्ह्यांचा समावेश होतो. अल्पसंख्यांक पण परंपरागत व स्वार्जित प्रतिष्ठेनें राहणाऱ्या स्थायिक महाराष्ट्रीयांचें जीवन तत्रस्थ बहुसंख्यांकांच्या सामाजिक जीवनाशीं पूर्णतया एकरूप झालेलें असून त्यांत त्यांनी आपल्या गुणांमुळे एक विशिष्ट स्थान प्राप्त करून घेतलेलें दिसत असल्यास तें युक्तच मानावें लागेल. राजकीय व सामाजिक क्षेत्रांत त्यांनी बहुजनसमाजाचा विश्वास कसा संपादन केला हें गेल्या चाळीस वर्षांतील चळवळींच्या इतिहासावरून स्पष्ट होतें.

तथापि यामुळे त्यांच्या मातृभाषाविषयक प्रेमांत उणीव उत्पन्न झाली असें समजण्याचें कारण नाही. प्राप्त परिस्थितींत कुटुंबांत, महाराष्ट्र समाजाच्या विशिष्ट कार्यक्रमांत व क्वचित कोठे मराठी शाळा काढूनहि मायबोलीची सेवा करण्याचे यथाशक्ति प्रयत्न करण्यांत येतात. सागर, जबलपूरसारखीं ठिकाणें वगळलीं तर इतरत्र मुलांमुलींचें शिक्षण-प्राथमिक सुद्धा-हिंदींतूनच होतें. त्यामुळे घरीं मातृभाषा व दारीं राष्ट्रभाषा असा प्रकार आढळतो. यामुळे व पंचवीस वर्षांपूर्वी वरील ठिकाणींहि ही सोय नसल्याने आणि मालगुजार महाराष्ट्रीयांचा संबंध ग्रामीण जनतेशीच विशेषत: येत असल्याने त्यांच्या मराठीवर हिंदीचा परिणाम कसा झाला हें पाहाणें उद्बोधक होईल असें वाटतें.

'बुंदेलखंडी मराठी' या पदाने 'बुंदेलखंडांतील स्थायिक महाराष्ट्रीयांच्या तोंडीं असणारी मराठी' इतकाच अर्थ विवक्षित आहे. कोंकणी, अहिराणी, खानदेशी, वऱ्हाडी, नागपुरी, देवळी यांच्याप्रमाणे ती एक प्रमुख पोटभाषा किंवा बोली आहे असें सूचित करण्याचा, किंवा तिचा 'हक्क', 'स्थान' इत्यादि प्रस्थापित करण्याचा कोणताहि उद्देश मुळीच नाही हें भाषासंगराच्या या गरम काळांत आधीच स्पष्ट केलेलें बरें!

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बुंदेलखंडांतील महाराष्ट्रीय सामान्यतः 'सगेरियन्' या नांवाने प्रसिद्ध आहेत. सागर हें त्यांचें 'मूल' स्थान. कारण पुष्कळशा सगेरियनांचें किंवा त्यांच्या जवळच्याच नातेवाइकांचें बालपण सागरला गेलेलें असायचें ! तसे मूळचे ते सारे कऱ्हाडकडचे. झांशीखेरीज बाकीचा भाग मध्यप्रांतांत मोडत असतांना देखील नागपुरीपेक्षा कोंकणी-पुणेरीचाच येथील 'लोकभागां'च्या भाषेवर अधिक 'असर' झालेला आढळून येतो. झांशी व सागर येथील मराठी राज्यकर्त्यांचा संबंध भोसल्यांपेक्षा पुणें दरबारशींच जास्त होता हें त्याचें कारण होय. उच्चारांतील विशिष्ट ळकरा व सानुनासिकत्व हेंच दर्शवितात.

भाषेच्या दृष्टीने पाहाणी करायची तर स्त्रियांच्या भाषेकडे—बोलण्याच्या पद्धतीकडे लक्ष देणें अगत्याचें ठरतें; कारण परमुलखांत भाषा शुद्ध ठेवण्याची कामगिरी स्त्रियांनी बजावलेली सर्वत्र आढळते. आधुनिक शिक्षणाचा संस्कार ज्यांना घडला नाही अशा स्त्रिया, व मराठींतून ज्यांचें शिक्षण झालें नाही असे पुरुष यांच्या भाषणलेखनाकडे या दृष्टीने लक्ष दिलें तर पुढे नमूद केल्याप्रमाणे कांही वाग्विशेष आढळून येतात. स्त्रिया मराठींतून तर पुरुष बुंदेलखंडींतून संवाद करत आहेत असें भाषाभगिनींच्या सलोख्याचें दृष्य येथे सहज आढळतें. महाराष्ट्रीयांच्या हिंदीला 'मरेठीपन की बू आती है' हा आक्षेप जसा ऐकूं येतो, तसा व्यवहारांतील बोलीने मराठीवर आपला 'असर जमाविला' आहे असेंहि आपणाला आढळून येईल. बानगीदाखल वाग्विशेषांचीं थोडीशीं—सहज लक्षांत भरण्यासारखीं उदाहरणें नमूद करतों—

(१) नामः—(१) 'आमचा मैत्र दोन दिवसांपासून दिक्क आहे !

मैत्र:—मित्र या अर्थी. (ज्ञानेश्वरींत हा शब्द 'मैत्री' अर्थाने आढळतो.) पाहा—भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥अ० १८॥ दिक्क=दुःख > दिक्क=आजारी.

(२) 'रामने आपळा सामान आणला. त्यांत चार पुस्तकांभी होत्या.':— 'रामा'चें सामान्यरूप न करतां त्याला विभक्तिप्रत्यय जोडला; सामान—पुलिंगी; पुस्तकां—स्त्रीलिंगी अनेकवचन; भी-हि ऐवजी अव्यय—हिंदीचें अनुसरण.

(३) इया हा प्रत्यय लावून लघुत्वदर्शक किंवा लाडिक रूपें बनविणें-बाजार-बजरिया, चिठ्ठी-चिटीया, अटारी (अट्टालिका=माडी)-अटरिया), बेटी बिट्टी-बिटिया (मुलीचें लाडकें नांव), गठरिया, पुटरिया, भंडरिया.

(४) नातेवाचक शब्द—दद्दा, कक्का, मम्मा, तातू (तात्या), बिट्टी, आते (आत्या) इ.

(२) सर्वनाम:—' आपण नीं असें केलें हें आम्हांला कोण माहीत ?'

आपणनीं:— सर्वपुरुषवाचक सर्वनामाला विभक्ति प्रत्यय. प्रा. डॉ. वि. भि. कोलते ' मीने, तूंने ' या वऱ्हाडी ग्रामीणांच्या तोंडीं येणाऱ्या रूपांचा साक्षेपाने पुरस्कार करतात. त्याला एक उपोद्बलक उदाहरण !

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(१) कोण:–'काय' एवजी. तसेंच 'हें आम्हीं कोण केलें?' 'कुठे? कांही–नाही' या निषेधार्थी. बुंदेलखंडी 'कौन' ला अनुसरून.

(२) 'आपला देश जो की आज या अवस्थेंत आहे—' संबंधी रचना. हा हिंदी-इंग्रजीचा संमिश्र परिणाम दिसतो.

(३) धातु:—(१) तो मला कमऱ्यांत पेंडतो. (खोलीत कोंडतो)

(२) बल्लुभैया तों आज छुट्टी मनावत आहेत. (मनाते हैं)

(३) वडे दद्दा चांगले वैद म्हणून बाजतात (बजते हैं=प्रसिद्ध आहेत.) तरीच त्यांचें नांव इतकें 'ऐकू' येतें!

(४) कृदन्त:—(१) 'आम्ही तों एव्हां कटरा होऊन आलों' (कटऱ्यांत-बाजारांत जाऊन किंवा कटऱ्याहून) ऊन-हून हा पंचमीचा प्रत्यय भूत्वा>होन्त> होऊन> हून असा पूर्वकाल-वाचकापासून अपभ्रंशमार्गे आला असें एक मत आहे.

(२) 'अंमळ मूंगफल्ली घेत या' (घेऊन) ऊन कृदन्ताबद्दल वर्तमान-कालवाचक.

(५) आज्ञार्थ:—(गौरवात्मक रचना) अ–'तुम्ही तेवढे कापड आणाल. किंवा (तूं) कापड आणशील.'

(१) तुम्ही:—लहान मुलामुलीलासुद्धा 'तुम्ही' म्हणून संबोधतात (हिंदींत 'तुम्' हा एकवचनी प्रयोग अशिष्ट मानतात.)

(२) आणाल-आणशील-यांत पुढे प्रश्नार्थक 'काय' अध्याहृत नसून नर्मवचनात्मक (Euphimistic) किंवा प्रेमळ असा हा आज्ञार्थक प्रयोगच आहे. (cf- Will you Please) do this for me? विनंतीवजा आज्ञा करण्याचा शिष्ट-संमत प्रकार.

आ. लहान मुलगा देखील आपलें नांव 'श्रीधरराव' सांगतो. पहिल्या दोन बाबींवरून बोलणाऱ्यांच्या सुसंस्कृत मनोवृत्तीवर तर तिसऱ्या प्रकारावरून गताधिकारावर (राज्य गेलें—राव राहिले!) प्रकाश पडतो.

(६) अव्यय:—भी-हि, तों तर, सो म्हणून, सोई-सुद्धा, 'उद्या'चें उच्चारण 'उद्‌या'सारखें, सर्वदूर (सबदूर) सर्वत्र, पूर्वी (क्रियाविशेषण)- अगोदर या अर्थी. इकडे-येथे

(७) वाक्प्रचार: —(१) इंद्रसभा करणें-न जेवणें, थंडा फराळ करणें. 'आज रात्री मुलांची इंद्रसभा'. (अमृतावरच निर्वाह करणाऱ्या इंद्र-सभेतील देवांना खाणेंपिणें कांही करावें लागत नाही या कल्पनेने तर हा अर्थ आला नसेल ना!)

(२) पांचवींचे किंवा षष्ठीचे फुटाणे (चणे) खाणें-बारशास जेवणें (प्रथेस अनुसरून)

(८) स्त्रियांची भाषणपद्धति:—स्त्रियांच्या बोलण्यांत पुढील वैशिष्ट्यें आढळतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(१) क्रियापदांची पुल्लिंगी रचना:—‘ अता वई चद्दा विद्दी नई येतां.’ अशा वेळी कर्तृवाचक शब्द अध्याहृत असतो. तो ‘आम्ही’ असा कल्पून बोललें जातें असें समजल्यास त्याचा निरास करतां येईल. ग्रामीण वऱ्हाडी बोलीत मात्र स्त्रिया ‘ मी जातों ’ असें सकर्तृक क्रियारूप वापरतात.

(२) ऊन कृदन्तांतील ‘ न ’ चा लोप करून अन्त्यवर्णाचा स्पष्ट सानुनासिक उच्चार.—‘तुमी कधी येऊं गेलां’ ‘अता आणखी उशीर हूं (होऊन) जाईल’.

(३) महाप्राणलोप:—नंई (नाही), तुमी (तुम्ही), अै (आहे), कंई (कांही).

[अ] ‘बाई’ या स्त्रियांच्या तोंडीं सहज येणाऱ्या शब्दाबद्दल ‘वई, भई’, किंवा ‘भैय्या’ (इतरत्र आढळणाऱ्या ‘बोवा’ प्रमाणें) असे पर्याय आढळतात.

[ब] उच्चारणांत हेल व सानुनासिकत्व यांचें प्राचुर्य.

[क] वाक्प्रचार :—निरोप देतांना स्त्रिया ‘हळूं या’ असें म्हणतात. हळूं > लघु-कालेन-‘लवकर या ’ हा भाव.

(९) नमुने :—[अ] स्त्रियांच्या भाषणाचीं हीं वैशिष्ट्यें दर्शविणारा पुढील परिच्छेद माझे मित्र श्री. प्रभाकरराव खेर, एम्. ए., एलूएल्. बी., यांनी लिहून दिला. त्यावरून ‘सागरी मराठी ’ची बरीच कल्पना येईल असें वाटतें.

“ अयेई वई गोदीऽऽ तुमी कधीं यऊं गेलां गांवावरून. अतां तबियत तर ठीक ऐ ना ? अमीं तर भैय्या कितीदां तुमच्याकडं यऊं गेलों. अतां भई लग्नाची तैय्यारी अगदीं करायलाच हवीं ऐं. ती सकी येऽवढीशी चिरमुटली निघाली अई सगळें करायला. अतां बोला. अयई मंदाऽऽ तुला तर वई पइलंच नंई मी. तूं कधीं येणारें ? तुम्ही लोग तर भैय्या कद्धी कद्धी येत नईयां. तुम्ही सोई येऊं जा बरें. अतां जातों. अणखीन् उशीर हूं जाईल. बरें यऊंऽऽ.”

[आ] कु. सुमन महाजन या विद्यार्थिनीने ‘ विकास ’ च्या ३ फेब्रुवारीच्या १९४७ च्या अंकात असाच एक नमुना दिला आहे. वरील परिच्छेदास यांतील कांही भाग पूरक म्हणून उधृत करतों—

“ काल गांवाहून बिंकूची चिठीया आली आहे कीं त्याचा सोई कान ठाकतो आहे. अमाला पाहा सो कालपासून खाशीच सुरू झाली. या मेल्या दु:खण्यानें असें कई घेरलें कीं ताकत तर अगदींच उरली नैयां. म्हटलें कीं जरा अटरीयावर जाऊन पाहूं कीं चुह्यांनी किती खपटें काढले. पुटरीयामध्ये भोकें करून त्याचा सत्यानाश न करो.—दूध भंडरीयांत (फडताळ) टरूं म्हटलें तर त्यांत झुंगेर मुंगेर टपकायची भीती वाटतें. त्याचीच काळजी होय करत पडलों होतों.”

(इ) “ कढींत चीटा पडला सो त्याला टांग पकडून एंचून टाका ” ही उक्ति प्रसिद्धच आहे.

(१०) लेखनः—हिंदी लेखनपद्धतीचे पुढील तीन परिणाम आढळतात.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(१) 'तो मनोहरला म्हणाला कीं मी न्हायला तालाव वर जाईन.'— विभक्ति प्रत्यय व शब्दयोगी अव्ययें तोडून लिहिणें.

(२) मी तुला पुनः२ (पुनः पुनः) सांगतो.—द्वित्वदर्शक २ चा आकडा. हा प्रकार त्या मानाने कमीच आढळतो.

(३) ड, ढ यांच्या खाली बिंदु नुक्ता देण्याचा प्रकार :—गयगड़ावर, कढ़ीत, सड़क इ.

बहुसंख्यांकांच्या भाषेने पूर्णपणें वेढलेल्या मराठी बोलीवर असे कांही परिणाम दिसून आले तर तें साहजिकच आहे. त्यांतहि मातृभाषेवरील प्रेमा कमी होऊं न देतां तिची प्रतिष्ठा वाढविण्याचे व राष्ट्रभाषेची स्पृहणीय सेवा करण्याचे जे द्विविध प्रयत्न होतात ते व्यापक दृष्टीचे व परिस्थित्यनुरूप नाहीत असें कोण म्हणेल ? वर वर्णिलेल्या विशेषांचा आढळ दिवसगतीने कमी होत आहे हें विसरून चालायचें नाही. तरुणपिढीची भाषा सर्वमान्य मराठीसारखी--ग्रांथिक स्वरूपाची होत आहे.

प्रस्तुत लेख शुद्ध भाषैक दृष्टीनेच लिहिला हें आवर्जून सांगितलेंच पाहिजे काय ?

शिशिर ग्रीष्म

माझ्या निष्पर्ण वठलेल्या ह्या जीवनावर
कोंवळी उन्हे तुझ्या चाहुलींची
एक क्षणभर विसांवतांच
फुटत असे नाजुक कोमल स्वर्णपालवी !
ह्या पानांफुलांना डंवरलेल्या वृक्षावर आज
पडतांच तुझीं दुपारचीं अत्युष्ण किरणें
खालीं ओघळते थंडगार घनदाट साउली
आणि कोणी एखादा पांथस्थ
उन्हाने चाबरलेला, क्लान्त, क्षुधापीडित
क्षणभर टेके
विकलगात्र तो
तुझ्यापासून होण्या बचाव
माझ्या साऊलींत !

—वसंत मोहरील.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजाभाऊ

—ना. रा. शेंडे, नागपूर.

[महाविदर्भातील नव्या पिढीचे वाङ्मय रसिक कसे वागतात, बोलतात याची कल्पना या शब्दचित्रावरून तर येईलच पण यापुढच्या श्री. शेंडे यांच्या लेखावरून ती अधिकाधिक स्पष्ट होत जाईल. शिवाय ही मंडळी आपल्या ओळखीचीहि आहेत पुनः ! —सं.]

❋

राजाराम वाचनालय हें माझ्या भेटीगाठीचं केन्द्रस्थान. राजाभाऊशी ओळख झाली ती तेथेच. माझा एक लेख वाचून मला भेटायला आले होते ते. वारेमाप स्तुति केली त्यांनी माझी त्या दिवशीं.

किडकिडित अंगकाठी, सांवळा वर्ण, घारे डोळे, भुरकट केस आणि किंचितसा उभट चेहरा असलेली व्यक्ति म्हणजे आमचे राजाभाऊ. सिगारेटच्या धुराचे लोटच्या लोट सोडीत आणि कपाळाला गुद्दे लगावणारे केस सारखे वर सारीत राजाभाऊ पहिल्याच भेटींत माझ्याशीं तब्बल तीन तास बोलत बसले. 'आजचे साहित्यिक' या विषयावर त्यांची बेछूट रसवंती मल्याळी नृत्याप्रमाणे बेफाम मुरके घेत होती.

कलानिष्ठ आणि वस्तुनिष्ठ वाङ्मयावर एक दीर्घ प्रवचन झोडून राजाभाऊंनी महाराष्ट्रांतील साहित्यिकांच्या कामगिरीचा आढावा घेतला—"अरे, धिप्पाड शरीरयष्टीचा अत्रे ना! ऊंऽ अत्रे उवाचच !...फडके? वा! अगदी फक्कड माणूस अत्रे इतकाच...सुखलोलुप जीवन जगवणारा अन् त्या खांडेकरांचं वेड काय घेऊन बसलांत ? सारंच कृत्रिम जग असतं आणि मामा वरेरकरांवर, अरे काय विश्वास ठेवायचा ?...छट्." मी मध्येच म्हटलें, "आणि भाऊराव माडखोलकर?" चुटकी देऊन, सिगारेटचं थोटुक झाडत राजाभाऊ भुंवया उंचावत म्हणाले, "अरे वा! श्रेष्ठ साहित्यिक आहेत ते. महाराज, जीवनांत चटके बसले आहेत त्यांना...कोणीची भीडमुर्वत नाही. अगदी रोकटोक लेखणी असते त्यांची. कलानिष्ठ आणि वस्तुनिष्ठ वाङ्मयाचा पाठ घ्यावा तो माडखोलकरांनीच!"

राजाभाऊंची जिव्हा सारखी सळसळत होती—भयंकर वेगांत होती ती. पण मध्येच ती अडखळली. कारणहि तसं नाजुक होतं ना! समोरून जाणाऱ्या एका युवतीकडे त्यांचं लक्ष गेलं. ते ताडकन् उठले. 'बरं उद्या बोलू या आणखी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपण ' असं म्हणत म्हणत ते त्या तरुणीच्या रोखाने निघाले. डावा पाय थबकवीत आणि उजवा पाय लांबसा टाकीत झोकांडी देत जाणाऱ्या त्यांच्या बारीक आकृतीकडे मी पाहातच राहिलों.

पहिल्याच भेटींत राजाभाऊंनी मला गुंगवून सोडलें होतें. त्यांच्या तल्लख बुद्धीची आणि विचारप्रवण शक्तीची मला पुरती कल्पना आली. वरी आहे वल्ली असं मी स्वतःशींच पुटपुटलों.

अलीकडे राजाभाऊ मला रोज भेटूं लागले. त्यांच्या अंतरंगाचा मला थोडा सुगावाहि घेतां येऊं लागला. प्रत्येक भेटींत, ह्या ना त्या कारणानं त्यांच्या मनाचा जळफळाट आणि संताप व्यक्त व्हायचाच. त्यावेळीं त्यांनी सगळं जग पालथं घातलेलं पाहण्यासारखं असतं. राजाभाऊ बोलतात खूप पण त्यांचे विचार निश्चित नसल्याचं मात्र माझं मत झालं. एका घटकेला एक तर दुसऱ्या घटकेला कांही दुसरंच. विचारप्रवाहाला नेहमी भरती ओहटी. ओढ्याला गढूळ पाण्याचा पूर यावा व लगेच तो ओसरून गाळ काय तो सांचावा. अगदी असंच त्यांच्या विचारपूराचं होत असतं. त्यांची स्मरणशक्ति मात्र भयंकर दांडगी. कोणाचंहि नांव निघो, राजाभाऊंनी त्यांच्या पूर्वेतिहासाचं परिशिष्ट जोडलंच म्हणून समजावं. आणि हें परिशिष्ट इतकं खुसखुशीत असतं की पोट धरून हसतां पुरेवाट होते. राजाभाऊ जिंदाबाद म्हणून आम्ही त्यांची वाहवा करतों.

राजाभाऊंच्या व्यासंगपूर्ण वाचनाबद्दल मी थोडा साशंक आहे. त्यांच्या विचारांना तितकीशी खोली नाही. पण ते जें बोलतात त्याचा पसारा एवढा अवाढव्य असतो की अपरिचित माणूस त्यांच्या माहितीनं दिपून जायचा. ग्रंथांचं, लेखांचं किंवा कथा-काव्याचं पुरतं वाचन सोडा पण एखादा मुद्दा का त्यांना खटकला की मागचा पुढचा विचार न करतां किंवा कसलाहि संदर्भ लक्षांत न घेतां त्यांची जी टकळी सुरूं होते ती इष्टमित्रांना इतकी सतावून सोडते की हात जोडून म्हणावं लागतं, " राजाभाऊ, असं नाही हें. उगीच कशाला संताप करून घेतां. असल्या नसत्या उठाठेवीनं काय बरं साध्य करणार ?" यावर ते तावातावानं म्हणतात, " Non Sense ! अरे तुम्हांला Understanding नाही. Low taste आहे तुमची. मी कांही कुणाला हार जाणार नाही. " ह्या उद्गारांत ते स्वतःचं समाधान मानतात आणि मग कच्चा आंबा खाऊन दांत विटल्यावर हुश्श हुश्श करीत राहातात.

विचाराप्रमाणेच राजाभाऊंची लेखणी भारीच कडवट. एखाद्या मल्लाप्रमाणे विरोधकांवर तुटून पडून तिने त्यांचा फडशा पाडला नाही अशी गोष्टच व्हायची नाही. आपण दुसऱ्यांना विनाकारण दुखवितों याची त्यांना कधी कधी पर्वा नसते. कसायाच्या कोयत्या सारख्या त्यांच्या लेखणींतून कितीतरी साहित्यिक बकऱ्यांचं रक्त घळघळूं लागतं. तें रक्त ओंजळींत घेऊन राजाभाऊ धापा टाकीत माझ्याकडे येतात आणि म्हणतात—" पाहिलंत हें ? काय दिसतं तुम्हाला ?" मी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

हळहळून म्हणतों, "अरेरे! राजाभाऊ काय केलंत हें! निरपराधी प्राण्यांचा हा खून काय म्हणून?" तेव्हा ते मिष्किलपणे हंसतात आणि म्हणतात, "ह्या मस्तावलेल्या बोकडांच्या माना अशा मुरगळल्या नाहीत तर हे लेकाचे शेफारून इतरांना इजापत करायचे! माझा झगडा न्यायासाठी असतो, समजलांत?" आणि मग हा मसाला चारआठ दिवस पुरायचा. नागपूरांतील साहित्यिक राजाभाऊंना घाबरतात तें उगीच नाही. राजाभाऊंचं '× × × × ×' हें सदर झोपेंतून उठल्याबरोबर लेखक चाळूं लागतात तें ह्याच भयानं. गेल्या चार वर्षांत साहित्यिकांच्या हृदयांत धडकी भरणारी जी पार्श्वभूमि निर्माण झाली त्याचं सारं श्रेय राजाभाऊंनाच आहे. आणि आता राजाभाऊंना आवरणं सोपं काम नाही. इतकेंच नव्हे तर त्यांच्या महामाया लेखणीनं पुण्या-मुंबईलाहि हादरा बसूं लागला आहे.

राजाभाऊंना राजकारणाशीं तसं देणं घेणं कांही नाही. तसे ते कोणत्याहि पक्षाचे रीतसर सभासद नाहीत. असं असलं तरी ते समाजसत्तावादाचे मोठे पुरस्कर्ते आहेत. त्यांच्याशी वाद घालणाऱ्यांना सांभाळूनच बोलावं लागतं. नाहीतर ते कोणाचा कसा फज्जा उडवतील याचा नेम नाही. तसं पाहूं गेल्यास राजाभाऊंनी कधी प्लॅटफॉर्म गाठला नाही. तें धाडस कदाचित त्याच्यांत नसावं. त्यांचं ब्रह्मज्ञान केवळ मैफीली पुरतंच मर्यादित आहे. हो, नेतागिरी करून त्यांना काय समाजकारण आणि राजकारण कुठं साधायचं आहे!

घरीं थापा देण्यांत राजाभाऊ मोठे वस्ताद. रात्रीला बाहेर वेळ दवडायचा असला तर ते एखाद्या मित्राला संगती घेऊन जातात. आणि घरीं हुकूम सोडतात—"हं आटपा लवकर...बाहेर जावचं आहे मला." मग मित्राला उद्देशून म्हणतात—"सगळे जण जमले असतील नाही? आपलीच वाट पाहात असतील...बरं आलोंच आता हं लवकर." केव्हा केव्हा तर मोटा गवई आला आहे; मोटा पुढारी आला आहे. त्याची मला भेट घ्यायची आहे वगैरे चिंच-बोरीवरच्या थापा देऊन ते घाई घाईनं सदरा चढवितात. घरांतून आवाज येतो—'राजाभाऊऽ लवकर परत या.' घरा बाहेर पडतां पडतां राजाभाऊ ओरडतात—'हो होऽ' नंतर रात्रीचे बारा, एक, दोन आणि कधी कधी संपूर्ण रात्रभर ते स्नेहसंवर्धक मंडळांत किंवा दुसरीकडे कुठं चकाट्या पिटत बसतात.

अलीकडे स्नेहसंवर्धक मंडळाने अख्या नागपूरला हलवून सोडलें आहे. नागपूरचे कलावंत, प्रसिद्ध लघुकथा लेखक-कवि, नाटककार आणि पत्रकार यांचा जबरदस्त संच म्हणजे स्नेहसंवर्धक मंडळ. या मंडळाच्याच भरंवशावर नागपूर नभोवाणी केन्द्रानं आपलं वर्ष यशस्वी केलं म्हणा ना! मोठ्या उमेदीनं राजाभाऊंनी या मंडळांत प्रवेश केला. मोठमोठाले वाद उपस्थित करून त्यांनी अनेक वेळा मंडळांतील सदस्यांना चकीत केलें. एकदा राजाभाऊंना लहर आली आणि त्यांनी मंडळाच्या कांही सदस्यावर आपल्या जहाल स्तंभांत तोंडसुख घेतलं. मग काय विचारता? दुसरे दिवशीं मंडळानं राजाभाऊंना जबाब विचारला. ते

आपला युक्तिवाद सांगू लागले. पण त्यांचं ऐकतो कोण! सर्वांच्या सर्व राजाभाऊंवर तुटून पडले. त्यावेळची राजाभाऊंची केविलवाणी मुद्रा, डोळ्यांत तरळणारे अश्रु-कंपित झालेला त्यांचा देह पाहण्यासारखा होता. कधी हार न जाणारे राजाभाऊ त्या दिवशी मात्र गोगलगायीप्रमाणे हातपाय एकवटून मंडळाला पूर्ण शरण आले. कारण मंडळानं त्यांचेवर बहिष्कार टाकण्याचं ठरविलं होतं व एकाने तर त्यांना सहा महिन्यांत जमीनदोस्त करतों म्हणून धमकी दिली होती. पण असं कांहीहि झालं तरी 'प्यारा राजाभाऊ' गमावणं मंडळाच्या जीवावर आलं होतं हें खरं.

एकदा मंडळांतील शोकीनानं सर्वांचे फोटो काढले. पण या सर्वांत राजा-भाऊंचा फोटो खौफनाक डाकूसारखा असा कांही भयानक निघाला की तो पाहून राजाभाऊ चटकन् धरणीवरच बसले. 'त्यांचं अंतरंगच जणूं बाहेर उमटून आलं' असं आमच्यांतील एक खट्याळ उद्गारला. दुर्दैव बिचाऱ्या राजाभाऊंचं!

परंतु, खरोखरी राजाभाऊंचं अंतरंग तसं नाही. कांहीना ते 'उपद्रवी' वाटत असले तरी मला मात्र निरुपद्रवीच वाटतात. सर्वसामान्य व्यवहारांत त्यांच्यांतील सहिष्णुता जागृत होते. राजाभाऊकडून दुसऱ्याला कदाचित अन्याय घडत असेल ही गोष्ट वेगळी; पण दुसरीकडून कोणावर अन्याय झाला तर त्यांचा आत्मा हळहळतो. कामाचा उरक त्यांना फार चांगला साधला आहे. आपली कामं झटपट उरकून उरला वेळ दवडायचा कसा म्हणून माझ्यासारख्या त्यांच्या एकनिष्ठ श्रोत्याकडे ते धाव घेतात. मग सिगारेटचे झुरके, चहाचे घोट आणि गप्पांचा ऊत कांही विचारूंच नका.

डॉक्टर, वकील, प्राध्यापक, साहित्यिक, पत्रकार, कचेरींतील कारकून, पानपट्टीवाले हे सगळे लोक राजाभाऊंच्या चांगल्या ओळखीचे. 'कसं काय राजाभाऊंऽ' अशी कोणी हाक दिली की राजाभाऊंनी त्याचा अर्धा एक तास वेळ घेतलाच म्हणून समजा. तितक्यांत दुसरा कोणी भेटला तर पहिल्याला सोडून ते दुसऱ्याचा पिच्छा पुरवितात आणि मग तिसरा, चौथा, पांचवा असा क्रम सुरूं होतो. प्रत्येकाची व्यवस्थित हजेरी घेऊन ते माझ्याकडे येतात अन् पाहा जग कुणीकडे धाव घेत आहे, मध्यमवर्गाची कशी दैना आहे, आपलं पुढं कसं? यासंबंधी मोठ्या बारकाव्याने विचार प्रदर्शित करून आकाश पाताळ एक करतात. मी केव्हा केव्हा म्हणतों, "राजाभाऊ, असार जीवित केवळ माया। रडगाणें हें गाऊं नका॥" यावर ते म्हणतात, "अरे बाबा, खरं आहे हें. पण विवंचना का सुटते पाठीमागची. दोनशे सव्वादोनशे पगार मिळतो मला, तरी पाहा ना जीवन जगविणं कसं मुष्किलीचं झालं आहे तें." मी म्हणतों, "तुमची ही स्थिति तर मग आमच्या सारख्या सहा सात जीवांना पोसणाऱ्या गरीबांनी पाचपन्नास रुपयांत कसं बरं जीवन कंठावं?" मग आमच्या प्रापंचिक जीवनावर मोठी गंभीर चर्चा सुरूं होते. अशावेळीं राजाभाऊंच्या अस्सल आत्म्या-ची खरी पारख होते आणि त्यांच्याबद्दलचा आदर दुणावतो.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राजाभाऊंनी 'The best brilliant table talker' म्हणून जी कीर्ति संपादली आहे तिचा मला मोठा अभिमान वाटतो. समाजांत घडणाऱ्या गोष्टींच्या बेरीज-वजाबाकीचा पाढा, ताळा करून करून ते सारखा वाचीत बसतात, मग स्थळ कोणतंहि असो—काळवेळ मुळी नाही. त्यांचा भूलोकांतील सुरासुरांचा 'हरि नाम गजर' रस्त्यांत, हॉटेलांत, वाचनालयांत किंवा चित्रपटगृहांत एकसारखा घणघणतो. 'अहो, जरा हळू बोला ना' असं हटकणारा कोणी तरी निघायचाच. परंतु राजाभाऊंना त्याचं काय सोयरसुतक ! त्यांची किनरी थयथयतच असते. ते जेव्हां खूपच रंगांत येतात तेव्हां 'जय सियावर रामभाऊ की जय' असं म्हणायची आमच्यावरहि पाळी येत नाही असं नाही.

राजाभाऊंच्या चिकित्सक दृष्टीचं सौंदर्यशास्त्र मोठं रहस्यमय असतं. बारीक सारीक गोष्टीहि त्यांच्या नजरेंतून सुटत नाहीत. कला आणि सौंदर्य यावरील त्यांचे विचार कोणालाहि थक्क करून सोडतील. संस्कृतिबद्दल व नीतिमत्तेबद्दल त्यांना विशेष चाड आहे. सौंदर्य निरीक्षणांत त्यांचं एकप्रकारचं संशोधन असतं म्हणूनच सौंदर्यपान करण्यासाठी त्यांची दृष्टि सारखी भिरभिरत असते. अनेक वेळा वांकडी होणारी त्यांची मान सरळ करून मला म्हणावं लागतं, "राजाभाऊ, ठीक नाही हें ! माणसानं नेहमी सरळ बघावं हो. नाहीतर एखाद दिवशीं भलताच प्रसंग ओढवायचा." तरी दुसऱ्या खेपेला राजाभाऊ माझ्या कानाशीं कुजबुजतात—"अरे, ती पाहा." मी आर्जवून म्हणतों, "च् च् राजाभाऊ ! सौंदर्य दिसलं तें न्याहाळूं नये असं नाही. पण असं मुद्दाम पाहात राहाणं इष्ट नाही." तेव्हा राजाभाऊ गंभीर होऊन उद्गारतात—"अहो, मी तरुणींकडे पाहतों तें कांही वाईट हेतूनं नाही. आता तुम्ही भलताच ग्रह करून घेत असाल तर गोष्ट निराळी." आणि मग जुन्या स्मृति आठवून ते आपल्या प्रेमभंगाचीं खुमासदार वर्णनं तास न् तास ऐकवीत बसतात. एकदा त्यांनी आपली 'प्रेमकथा' मासिकांत छापण्यासाठी मजजवळ आणूनहि दिली होती. पण ती भयंकर उन्मादक–रोमहर्षक कथा मात्र मी प्रसिद्ध करूं शकलों नाही.

राजाभाऊंना वाङ्मयीन मुदती तापाचे वारंवार झटके येतात. केव्हा केव्हा तर हा रोग टायफाइडवर जातो अन् मग १०४ अंशापर्यंत टेंपरेचर जाऊन राजाभाऊ असं कांही जगावेगळं वरळतात की त्यांना जहालशा वाङ्मयीन शब्दरसाचं इन्जक्शन द्यावं लागतं. त्यावेळीं त्याचं कण्हणं सोसवत नाही अन् नंतर त्यांना कटुमर्दानीचा नागपुरी गुंगारा देऊनच गप्प करणं भाग पडतं.

एकदा दूरच्या साहित्य संम्मेलनाला आम्ही गेलों होतों. राजाभाऊहि आपली वळकटी घेऊन आले होते. बऱ्याच साहित्यिकांनी ओली (?) खूप झोकली होती. राजाभाऊंना वाटलं, हे लेकाचे सारे दिमाख मिरवीत आहेत. आपण स्वस्थ कां बसावं ? पण त्यांना 'ओली'चं सेवन तर पथ्य. तेव्हा त्यांनी माझ्याबरोबर चारपांच कप चहा टोसला आणि अंगांत आल्याचें दाखवून अशी कांही अंगांत आणली अन् सर्वांचा खिमा करायला सुरुवात केली की सगळे साहित्यिक दंग

झाले. तिकडे माणिकबाई दादरकरांचें गाणें रंगांत चढलें होतें तर इकडे राजाभाऊंच्या अंगांतील भूत धुमाकूळ घालीत होतें. परंतु जेव्हा राजाभाऊंचं सोंग उघडकीस आलं तेव्हा...!

आताशा कुठं राजाभाऊंनी ज्ञानेश्वरी हातीं घेतली आहे. संत वाङ्मया-संबंधानं किंचितसा पाझर फुटलेला आढळतो. महाविदर्भाबाहेरील शंकरराव जावडेकर, अच्युतराव पटवर्धन, साने गुरुजी, धनंजयराव गाडगीळ हे त्यांचे आवडते लेखक व पुढारी. नागपूरांतील अवघ्या तीन साहित्यिकांना ते मानतात. त्यांच्याच शब्दांत—भाऊराव माडखोलकर फर्स्ट, श्री. ना. बनहट्टी सेकंड आणि पु. भा. भावे थर्ड. अगदी आज त्यांच्या ओठावर महाराष्ट्रांत सर्वश्रेष्ठ लघुकथा लेखक म्हणून पु. भा. भावे नाचत आहेत. त्यांचं श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी त्यांची लेखणी आणि वाणी बेगुमानपणे सळसळत आहे. आम्ही म्हणतों, " अहो, राजाभाऊ, महाराष्ट्रांत आणखीहि कांही प्रथम श्रेणीचे लघुकथा लेखक आहेत ना! गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, कुसुमावतीबाई देशपांडे, वामनराव चोरघडे, शांताराम, गो. रा. दोडके अन्..." पण लगेच सिगारेटचा भपकारा सोडीत आवेशानं ते म्हणतात, " असतील हो दोनतीन तसे. पण भाव्यांपेक्षा श्रेष्ठ! छट्, मी म्हणतो तेच बरोबर, बस्स! कादंबरीकार व टीकाकार माडखोलकर, मार्मिक विवेचक बनहट्टी, उत्कृष्ट लघुकथा लेखक भावे आणि...मी स्वत: चौथा..."

" तुम्ही स्वत: चौथे! कसे काय बुवा!"

" अरे मीहि एक टीकाकारच की–"

" आँ ऽ तुम्ही! हो हो दिसतय् तसं!" म्हणून आम्ही हसलों की ते आपल्या बारीक कमरेवर एक हात टेवून दुसऱ्या हातानं कपाळावर सरकलेले केस वर सारीत उसळून म्हणतात, " अरे हसता काय असे! तुम्ही प्रतारणा करीत असले म्हणून सारेच करतील की काय?"

" छे छे!" असं म्हणून आम्ही त्यांची पाठ थोपटतों.

खरोखरी राजाभाऊ एक मार्मिक टीकाकार आहेत. त्यांच्या लेखणीला तीक्ष्ण धार आहे. थोडा थोडा कां होईना सर्व विषयांच्या माहितीचा त्यांच्याजवळ संग्रह आहे. कोणाहि संबंधानं लवकरच गैरसमज करून घेण्याची त्यांची वृत्ति असली तरी ते डूक धरून बसत नाहीत. मनांत भडभडून आलेलं ते सांगून टाकतात आणि हृदय स्वच्छ करतात. तिखट वाणीमुळे त्यांना मित्रत्व टिकविणं जड जात असलं तरी जे जवळून त्यांना ओळखतात ते त्यांचेशीं वैमनस्य पत्करीत नाहीत. पण राजाभाऊंना हें उमगायला मात्र बराच वेळ लागतो.

'राजाभाऊ' हें नांव मला मोठं प्रिय वाटतं. त्यांच्या हालचालींच्या गोड लीला मनाची भारीच करमणूक करतात. आमच्या नागपूरांतील राजाभाऊ हें पात्रच असं आहे की त्याचेवर एका हृदयंगम कादंबरीचा जन्म होऊं शकेल. राजाभाऊंनी माझ्याबद्दल कितीहि गैरसमज केला किंवा ते कितीहि अद्वातद्वा बोलले तरी ह्या अष्टपैलू रत्नाला मला विसरतां येणार नाही. एखाद दिवशीं राजाभाऊंचं दर्शन घडलं नाही तर माझा जीव कासावीस होतो अन् मग मी त्यांच्या शोधार्थ भटकूं लागतो.

रक्तशब्द दुधारी तलवार !

★

किती लाजिरवाणें—
अनेक रकाने येती नजरेखालीं
अस्त्र टीकेचें बुजबुजलेलें
डागळलेलें, फसफसलेलें
शब्दा-शब्दा खालीं !
अन् वलय उठती हृदयांतरीं
क्षोभ मनाचा पेट घेवोनि, बोले,
ठेंचावा हा टीकाकार शब्दसैतान, जो,
बेजबाबदारीने बेधुंद
चालवी लेखणी
ना रीति, ना नीति, ना लगाम हातीं
शिवराळ चाले करीत हास्य विकट
माणुसकीच्या उरीं बसोनि, तियेवर
खुपसे रक्तशब्द दुधारी तलवार !

भारतीय संस्कृति, जिचेवर
आग पाखडली ज्याने
की एकनिष्ठ सेवकाला उगीच
ओढला रकान्यांत ज्याने
की मानवतेचा पुरस्कर्ता अथवा
कलाकार नी श्रेष्ठ साहित्यिक
खेचिलें तयांना बाजारीं ज्याने—
आत्मसंतोषास्तव बेताल चालला
ज्ञान का तो टीकाकार!...!
देव्हाऱ्यावर चढून फेकीले देव
दो जीवामध्ये घातला गळफास
मंगल वातावरणीं सांडली घाण अश्लील
आणि सुंदरतेचा गळा दाबूनि, तियेवर
खुपसे रक्तशब्द दुधारी तलवार !

× ×

वस्तुनिष्ठ—कलानिष्ठ हवे
तोललेले शब्द मोजके
पारड्यांत, स्मरून न्यायदेवता;
विचक्षणांच्या गंभीरतेने
हित—अहित
न्यायनिष्ठुर सद्भावनेने
हा गाळ, हें पाणी निर्मळ
वितंडवाद—शब्दछल सांडून,
व्यासंगपूर्ण लेखणीच्या टोकें
भाव उजाळीत—विचारसौंदर्य प्रदर्शीत
प्रेतांनाहि संजिवनी देत;
चित्र उभें उच्च, स्पष्ट, स्वच्छ करीत
तळपावी प्रभावी टीकाकार तलवार
निर्लेप.
पण, नको नको रे ती लांछनास्पद
प्रछन्न रक्तशब्द दुधारी तलवार !

—नारायण गणेशपूरकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाणी–विलास

—विलासी

◆

मुंबईच्या 'चित्रा' या साप्ताहिकाचे विद्वान संपादक डॉ. ग. य. चिटणीस यांच्या निधनानें, मराठींतील एक चतुरस्त्र साहित्यिक नाहीसा झाला आहे. साहित्य, राजकारण, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान या साऱ्या विषयांत त्यांची गती होती. इंग्रजी भाषेवर त्यांचें विशेष प्रभुत्व होतें. तीन चार कादंबऱ्या लिहून त्यांनी आपली ललितकला वाचकांच्या नजरेला आणली. प्रसिद्ध अभिनेत्री लीला चिटणीस यांचे व त्यांचे संबंध तुटल्यानंतर त्यांच्या कार्यक्षेत्रावर एक प्रकारची सावली पडली होती. परंतु श्री. मामासाहेब वरेरकर यांच्या सुविद्य कन्यका माई वरेरकर यांचेशी त्यांचा विवाह झाल्यानंतर माईंच्या सहवासांत त्यांच्या लेखनवृक्षाला फुलोर आला होता. त्यांचें आत्मचरित्र क्रमशः वृत्तपत्रांतून आलें आहे. डॉ. केतकरांनंतर महाराष्ट्र या दुसऱ्या विद्वान विचारवंतास अंतरला आहे. त्यांना आम्ही आमची श्रद्धांजली अर्पण करतों.

× × ×

नागपूर नभोवाणीवरून श्री. वाकनीस यांची धारवाड येथे बदली झाल्यामुळे, एका दक्ष व लोकप्रिय मराठी रेडिओ-अधिकाऱ्याला नागपूर केंद्र मुकलें आहे. कोणताहि चांगला अधिकारी नागपूरला फार दिवस लाभत नाही हें नागपूरकरांचें दुर्भाग्यच म्हणावयाचें. संगीत-विभागांतील श्री. कानिटकर मुंबईला गेले. श्री. मुकर्जी जालंदरला आणि आता श्री. वाकनीस यांची बदली! या बदल्यांच्या मागे कांही आहे की काय अशी शंका हें सर्व पाहून येते. गेल्या कांही दिवसांपूर्वी मराठी मध्यप्रांतातील रेडिओ लायसेंसची संख्या २००० ते २५०० नी वाढली आहे असें वृत्तपत्रांत जाहीर झालें होतें. नागपूर केंद्राची १५० मैलाची कक्षा लक्षांत घेता, कोणताही हिंदी मुलूख या टापूत येत नाही. त्या दृष्टीने नागपूरचें केंद्र मराठीच! परंतु राष्ट्रीय दृष्टिकोनाच्या नांवाखाली मराठीच्या या न्याय्य हक्कावरहि आक्रमण करण्यांत आलें. त्याबद्दलहि आम्ही कांही बोललों नाही. परंतु कांही कांही वेळा मन द्विधा होतें. मागे मुंबई केंद्रावर एका श्रोत्याने असा प्रश्न विचारला होता, कीं महाराष्ट्राचें माहेरघर म्हणून मुंबईला स्वतंत्र मराठी-लहरी कां असू नये! या प्रश्नाला उत्तर म्हणून मुंबई केंद्रातर्फे बडोदा व नागपूर या दोन नूतन मराठी (!) केंद्राकडे बोट दाखवून सांगण्यांत आलें होतें की "हीं दोन मराठी केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत" ही वस्तुस्थिति की नुसते

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रलाप ! बडोदा स्टेशन चुकून ऐकूं आलेंच तर गुजराथी शिवाय कार्यक्रम ऐकूं येत नाहीत—आणि इथे सदा आपलें—'ये नागपूर है!' मराठी कार्यक्रमाच्या अनांऊसमेंट्सुद्दि हिंदींत! "आपके सामने कोल्हाटकर इ. इ." आणि मुंबई-वाल्यांना सांगायचें की नागपूर पूर्णतः मराठी आहे. फक्त तुम्हाला ऐकूं येत नाही हें तुमचें दुर्भाग्य !

माझ्या म्हणण्याचा तात्पर्यार्थ असा की, मराठी मायबोलीच्या कक्षेंत असलेल्या, मराठी मध्यप्रांताच्या नागपूर नभोवाणीवर मराठी जाणणारे केंद्राधिकारी कां नाहीत? असलेले अधिकारी कां बदलण्यांत आले? सध्या इथे दोन केंद्राधिकारी आहेत. सर्वप्रमुख श्री. उमाशंकर यांना मराठी भाषा येत नाही—कळत नाही. त्यामुळे त्यांच्यात न्याय असेल कदाचित पण भाषेबद्दल जिव्हाळा नाही. वाकनीस होते तोपर्यंत मराठीबद्दल आपुलकीने तक्रार ऐकून घेणारा एक तरी अधिकारी होता, की जो मराठीच्या न्याय्य हक्काबद्दल जागरूक होता. ते होते तोपर्यंत मुख्य केंद्राधिकारी श्री. उमाशंकर यांचेपर्यंत तक्रार करण्याचें आम्हाला कारणहि नव्हतें. वाकनीस यांच्या रिकाम्या होऊं घातलेल्या जागेवर मुंबईहून एखादे दुसरे मराठी अधिकारी येतील अशी आमची कल्पना होती. पण त्या जागीं या केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी कु. अंजना सियाल या पंजाबी महिलेची नेमणूक झाली आहे. श्री. श्रीनिवासन् यांच्या बदलीमुळे रिकामी झालेली जागा रहित करण्यांत आली आहे. अशा परिस्थितींत मराठी कार्यक्रमाचें काय होणार याबद्दल शंका वाटते! नागपूरला हल्ली दोन्ही प्रमुख अधिकारी मराठी न जाणणारे आहेत. त्यांना या प्रांताची भाषा कळत नाही, वाङ्मय कळत नाही, त्याचें संगीत कळत नाही असें मी म्हटलें तर सत्याचा खून होणार नाही. या केंद्रासाटीं या अधिकाऱ्यांच्या जागांची जाहिरात 'फेडरल सर्व्हिस कमिशन' तर्फे करतेवेळीं मराठी भाषा येणें ही एक अत्यंत आवश्यक बाब समजली जावी, अशा अर्थाचें एक कलम असें. म्हणजे मराठी जाणणारे अधिकारी कमी आहेत काय? तसें असेल तर पूर्वी असणाऱ्या मराठी अधिकाऱ्यांना कां बदलण्यांत आलें हा प्रश्नच आहे.

पुढील महिन्यांत नभोवाणी खात्याचे मंत्री माननीय श्री. रंगनाथ दिवाकर नागपूरला येणार असें ऐकतों. अखिल महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या एका शिष्ट-मंडळाने गेल्यावर्षी त्यांची भेट घेऊन स्वतंत्र मराठी केंद्राची मागणी केली होती व त्याबद्दल ना. दिवाकर यांनी त्यांच्याशी आपलेपणाने विचार विनिमय केला होता. त्यावरून मराठीबद्दल ना. दिवाकर हे दक्ष आहेत हें उघड आहे. त्यांच्या भेटीचा योग साधून नागपूरच्या मराठी जनतेने आपलें गाऱ्हाणें त्यांचे कानावर अवश्य घालावें. वरील दोन्ही केंद्राधिकाऱ्यांच्या वैयक्तिक क्षमतेबद्दल भलेपणाबद्दल मला कांहीहि म्हणायचें कारण नाही. फक्त नागपूर केंद्राला मराठी केंद्राधिकारी असणें ही मागणी अगदी न्याय्य आहे हें पटवायचें आहे.

× × ×

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"वाढत्या किंमती" या भाषणमालेंत गुंफण्यांत आलेल्या तिन्ही भाषणांची किंवा मुलाखतींची कल्पना चांगली होती. वाङ्मयीन मूल्याच्या दृष्टीनें पाहतां, प्रा. चोरघडे यांनी घेतलेली मास्तर व कारकून ही मुलाखत चांगली होती. चोरघड्यांमधील नट यावेळीं जागा झालेला दिसत होता. या मुलाखतीच्याच 'चालीवर ' " समाजाचे आधारस्तंभ " (Builders of the Society) अशा शिर्षकाखाली, ज्या ज्या लोकांनी समाजाची नैतिक मूल्यें घडविण्यासाठीं श्रम घेतले आहेत, त्यांची भाषणें, मुलाखती वगैरे व्हायला पाहिजेत. लेखक व प्रकाशक यांचे परस्पर संबंध वगैरे विषयहि या साक्षरता प्रसाराच्या काळांत नवलाचे होतील. ता. ८ सप्टेंबरची "सारजा" ही लोकगीतावर आधारलेली संगीतिका नवतीच्या दृष्टीने चांगली वाटली. मध्यंतरीचा कांही संवाद मुक्तछंदाच्या पद्धतीवर म्हणजे नादमय होता व त्याला पार्श्वसंगीत म्हणून नुसत्या डग्गीची साथ होती. कल्पना चांगली. परंतु सुरवातीची भाषणें 'प्रोज' होतीं. तींहि या संवादासारखीं असतीं तर परिणाम आणखी चांगला झाला असता. गाणें संपण्यापूर्वींच भाषणांची आगगाडी सुरू होत असे. त्याचा परिणाम असा झाला की 'सारजा' आपल्या माहेरी ठरल्यावेळेपेक्षा पांच मिनिटें अगोदर येऊन पोचली.

गाण्यांना चाली चांगल्या दिल्या होत्या. पण मला या चालींचा 'तोच तो' पण आता अतिपरिचित वाटतो. श्री गोळवलकर यांनी पंजाबी चाली वगळून आता निराळी स्वररचना करावी अशी माझी त्यांना आग्रहाची सूचना आहे. मराठी संगीतांत पंजाब कां ? ' सारजे ' सारख्या मराठी संस्कार झालेल्या मराठी वेष ल्यालेल्या माहेरवाशिणीला, सलवार घालून ढोलक्यावर ठक् ठक् ठक् ठक् करतांना पाहून कसेंसेंच वाटतें. " जा झुणझुणु पांखरा—" गीताची चाल चांगली होती. श्री. बकुलराय यांच्या ' ऋतुचक्र ' किंवा श्री. मंगरूळकर यांच्या ' येरे येरे पावसा ' या संगीतिकेंतहि सारा पंजाब ! मराठीला आपण साऱ्यांनी मानाने लेवविलें पाहिजे व वैचित्र्य निर्माण केलें पाहिजे.

साहित्याच्या दृष्टीने चांगल्यापैकी भाषणमाला या महिन्यांत झाली. हल्ली नवकाव्याविषयीं बरेंच कुतुहल निर्माण झालें आहे. या निमित्ताने मुंबई केंद्राने ध्वनिमुद्रित केलेलीं प्रा. श्री. के. क्षीरसागर, आ. रा. देशपांडे, आणि प्रा. पु. शि. रेगे यांचीं भाषणें मराठी टीकाकारांना कांही दिवस खाद्य पुरवितील असें वाटतें. क्षीरसागरांनी या काव्यप्रकारात नवीन कांही नाही आणि काव्यतर नाहीच नाही असें जाहीर केलें. काव्य फक्त कांही ठराविक वस्तूवर होऊं शकतें इतर कांही वस्तू जसा कारकून वगैरे काव्यविषय होऊ शकत नाहीत अशीं त्यांचीं मतें आहेत. प्रा. रेग्यांनी स्वत:चेंच घोडें पुढें दामटलें. अनिलांच्या भाषणांत जाड्य फार होतें. हीं तिन्हीं भाषणें एकांगी झालीत. नवकाव्याचा याहून उच्चपातळीवरून विचार व्हायला हवा. याची दुसरी बाजू किंवा नवकाव्याचें नक्की स्वरूप काय आहे किंवा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कसें असावें याविषयी समालोचनात्मक भाषण, नभोवाणी केंद्राने प्रक्षेपित करावें अशी माझी सूचना आहे.

*

'रसरंजन—' या पाक्षिक कार्यक्रमांत इष्ट बदल होत आहे. 'सुमति गुप्ते' यांची मुलाखत होती याहून चांगली करता आली असती. नणंदेने भावजयीची मुलाखत घेतली त्यापेक्षा एखादी कलाचतुर स्त्री मुलाखत घेण्यासाठी योजिली असती तर ती होती याहून उद्बोधक झाली असती. त्यामानानें श्री. वऱ्हाडपांडे यांची मुलाखत याच सदरांत चांगल्या रितीनें घेण्यांत आली होती, ती वाचकांना आठवत असेलच. 'तुम्हाला मुलगी आहे मग तुम्ही सिनेमांत काम कसा करता?" किंवा "तुम्ही या पुढे सिनेमात काम करणार काय?" यासारखे निर्बुद्ध प्रश्न विचारण्यापेक्षा, महाराष्ट्रीय स्त्री आणि सिनेमा, सिनेमा धंद्याचें वातावरण आणि कुलीनता वगैरे संबंधी जरा मोकळेपणें माहिती विचारता आली असती. तरीपण सुमति गुप्ते यांच्या हजरीचा योग्य फायदा करून घेतल्याबद्दल 'रसराजा'चें अभिनंदन! रस-रंजना विषयी आणखी एक. 'काव्यगायन' या प्रकाराला जें एक मराठी साहित्यांत 'शिवी' सारखें नामाभिधान प्राप्त होत आहे, त्याला नभोवाणी केंद्राने आपल्यापरी हातभार लावू नये अशी माझी सूचना आहे. श्री. मोहरील यांचें काव्यगायनाबद्दल म्हणतों आहें मी. कविता आम्हांला वाचता येतात. त्या नभोवाणीवरून ऐकावयाच्या असतील, तर सुरेल किंवा शब्दोच्चार स्पष्ट असणाऱ्या व्यक्तीकडून म्हणून घेतल्या पाहिजेत. कवीच्याच मुखांतून त्या जास्त चांगल्या वाटतात असें नव्हे. श्री. मोहरील यांनी जें कांही पुटपुटत वाचलें तें सगळें अगम्य होतें! कवींना त्यांच्या कविता गाऊं द्यायच्या असल्या, तर त्यासाठीहि तालीम देवावी. श्रोत्यांवर साहित्यसेवेच्या नांवाखालीं हा अत्याचार नको.

नागपूरात बरेच साहित्यिक आहेत. या मंडळीपैकी पुष्कळ लोक नभोवाणीच्या सुरवातीला चांगले चमकले. पण गेल्या चारपांच महिन्यांत एकदम मंदी आली दिसते. हा साहित्यिकांचा असहकार की नभोवाणी केंद्राचें कांही राजकारण? सध्यां तरी तें कोडें सोडवीत नाही मी! श्री. दिवाकर लवकरच इथे येऊं घातले आहेत. त्यांच्या भेटीनंतर हें कोडें उघडेल अशी आज आशा करूं यां. नाही तर या प्रकरणाच्या मुळाशीं काय दडलें आहे याची शहानिशा मला या सदरांत करावी लागेल.

*

मला नभोवाणीच्या चालकांना एक प्रश्न विचारावासा वाटतो. टोपण नांवांनी लेखकांचे कार्यक्रम होऊं शकतात काय? काल्पनिक नांवें धारण केलेल्या व्यक्तीशी रेडिओ स्टेशन कार्यक्रमांचा करार करूं शकते काय? असें कांही

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कार्यक्रम झाले आहेत काय ? हें प्रकरण उघड झालें असल्यास, या गफलती-बद्दल कांही कारवाई करण्यात आली काय ? हा प्रश्न आवर्जून काढायचा याचें कारण असें आहे की कांही दिवसांपूर्वी, नागपूरांतील एका पत्रांत, विशिष्ट लोकांनाच कार्यक्रम देण्यांत येतात असा गहजब करण्यात आला होता. त्या-नंतर त्यापैकीच एकाला टोपण नांवानें कार्यक्रम मिळाल्याची गुणगुण आहे. तेव्हां खरें व खोटें यांतील शहानिशा होण्यासाठी, या गोष्टींचा निकाल लागणें जरूर आहे. कारण हल्ली कांही लोकांच्या बाबतीत चोर सोडून संन्याशाला फांशी द्यायचा प्रकार सुरू झाला आहे. ब्लॅक मेलचें अस्त्र एकंदरीत किंत्येकांना मानवतें असें दिसतें.

स्वप्नदीप—

अथांग गोल लोचनीं
अबोल भाव रंगले,
अबोल गूढ अनुभुतींत
प्रणयरंग तेवले,
तरल पापण्यामधीं
आयुस्वप्न पाहिलें,
नि मानसांत माझिया
स्वप्न दीप उजळले !

—लीला वाचासुंदर

'युगवाणी'कडे परीक्षणार्थ—

१. सोन्याचे देव—(ले. नाना जोग, प्र. पां. रा. ढमढेरे)
२. विद्याहरणाचें अंतरंग—(ले. वसंत शांताराम देसाई, प्र. के. भि. ढवळे, मुंबई.)
३. माईच्या गोष्टी—(ले. मालतीबाई दांडेकर, प्र. के. भि. ढवळे, मुंबई.)
४. वर्धा-शिक्षण—(ले. शंकर धोंडो मार्डीकर, प्र. के. भि. ढवळे, मुंबई.)
५. मतें आणि मतभेद—(ले. वा. ल. कुळकर्णी, प्र. के. भि. ढवळे, मुंबई)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आशादीप

(अभंग)

अंधार भेसूर । नाही झिमझीम
नाही चमचम । बिजलीची ॥१॥

पसरली छाया । दाटला काळोख
चंद्रमा तारका । झाकोनीया ॥२॥

पावलों पावलीं । काटे अडचण
शांतता भयाण । चोंही बाजू ॥३॥

फार दूर दूर । राहिलें मंदीर
वाढवी अंतर । चुकोनीया ॥४॥

कोणासाठीं उभा । उभा मी एकला
अंतरीचा केला । आशादीप ॥५॥

तुझिया चाहुली । खुले दिपकळी
पाकळी, पाकळी । उमलोनी ॥६॥

जवळ मंदीर । फार नाही दूर
काय तें अंतर । तुझ्यासवें ॥७॥

तुझ्या संगतीला । मार्ग ओसरला
तेजें उजळला । आशादीप ॥८॥

निराशा बाहेरी । आसरा मंदिरी
वाढवीत ज्योति । उजळोनी ॥९॥

वाढवू सुकिर्ती । पूजोनिया मूर्ति
आशेची आरती । नंदादीपी ॥१०॥

—श्री. ना. बेहेरे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ–परीक्षांचा निकाल

ऑगस्ट १९४९ मध्ये झालेल्या परीक्षांत पुढील विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. (गुणानुक्रमें)

मराठी प्रवेश :

वर्ग १ ला. कांता शिशुपाल चवरे.

वर्ग २ रा. अब्दुल अजीज कुरैशी; शु. मो. फुरसुले.

वर्ग ३ रा. त्रिशला रतनलाल महाजन.

मराठी प्रारंभ :

वर्ग १ ला. रा. बा. कोलारकर; मंदा ग. तराळकर.

वर्ग २ रा. कु. वि. पुं. पदवाड; अ. ना. डबीर; म. रा. काळे; ना. बा. बालणी; रा. म. उमाळे.

वर्ग ३ रा. इंदु दशरथ अलोने; तु. ना. ढोळस; ल. ग. डबीर; त्र्यं. स. राऊत; कृ. वा. खोडे; भा. वा. जोशी.

साहित्यविनीत :

वर्ग १ ला. धों. बा. बाहेकर; मा. अ. ढोले; चं. दि. तारे; म. द. लखे; प. झो. वऱ्होकर; भा. अं. पाध्ये; ना. ग. पवार.

वर्ग २ रा. भी. द. पावडे; कि. द. मत्ते; कु. दुर्गा श्री. देशपांडे; वि. बा. किटकरू; द. के. दिवाणजी; शि. कि. पांडे; पां. ता. रेवतकर; ल. ना. गुल्हाने; भा. आ. लभे; भा. शं. कुळकर्णी; ए. जी. पाटील; श्री. पुं. गावंडे; भा. का. डफळापूरकर; कु. लीला सी. पांढरकामे; म. रा. देशमुख; कु. वत्सला त्रि. पांडे; म. सी. ढोले; दा. गो. मेंढे; कु. सुमन वि. गणोरकर; वा. म. खडसे; अ. ग. देशमुख; प्र. भा. हिर्डे; र. हे. नवगजे; पां. स. भावसार; शि. मा. तारकसे; गु. ना. सुरजुसे; ब. र. महात्मे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर्ग ३ रा. ली. ल. शेंडे; ना. अं. इंगळे; ज. नि. बोंबटकर; वि. कृ. जोशी; द. गो. मुळे; शं. सू. वरघणे; शि. गो. जयस्वाल; म. भा. गव्हाणे, रा. कृ. गोरे; वि. ग. कुंभारे; कृ. गो. कुळकर्णी; रा. ब. घारस्कर; आ. अ. देशपांडे; प्र. दि. देशमुख; ब. आ. लोखंडे; शा. तु. कलोरे; त्र. रा. डांगे; मो. ना. देशमुख; य. शं. दाते; त्र. बा. इंदूरकर; दे. भ. पौलकर; कु. सुमन त्रिं. पांडे; मा. आ. चौधरी; जी. एम्. पांढरीकर; भा. ना. चोपडे.

साहित्यपरिचित :

वर्ग २ रा. कु. कमल रा. शेंडे; चिं. दा. जोशी; सौ. सिंधु मुडकी; कु. मंदाकिनी जामदार; कांता मोरेश्वर जोशी; कुसुम मा. पाचपोर; भा. ग. काळी; चिं. सी. नुमाने; तारा राजेश्वर जोशी; सिंधु मा. पाचपोर; अ. पां. इंगळे.

वर्ग ३ रा. प्र. ग. गुप्ते; कमल वि. काणे; अब्दुल वाहाब नूरमहंमद; म. म. मोरे; कु. सुमन ना. दुर्गे; कु. मालती गो. खंडागळे; अ. रा. नासरे; पद्मा ग. गुप्ते; कु. सुमन ना. देशपांडे; व. भ. कठाळे; प. सी. सपकाळ; सो. शं. धोरण; रा. रा. वेले; ल. ना. वेलेकर; श्री. पु. पुरोहित; प्र. ए. तारे; शा. गं. कठाळे; कु. वि. पु. मेंढी; दा. ना. आसमवार; ओं. शं. पाटील.

साहित्यस्नातक :

वर्ग १ ला. के. रा. जोशी.

वर्ग २ रा. कु. दुर्गा रा. पटवर्धन; कु. सुधा म. जोशी; कु. शकुंतला बा. कवीश्वर; कु. सुशीला पु. खोलापूरकर.

वर्ग ३ रा. इंदु गो. काळे; चं. पु. तापस; गो. धुं. जोशी; शांता कृ. दातार.

नागपूर
ता. २० सेप्टें. ४९

वि. भि. कोलते,
अध्यक्ष, परीक्षा समिति.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पत्रक २

विदर्भ साहित्य संघ—परीक्षा समिति

परीक्षांचा अभ्यासक्रम—जानेवारी १९५० पासून पुढे

मराठी प्रवेश :

मराठी चौथ्या इयत्तेपर्यंतचें मराठी भाषेचें ज्ञान ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना झालें पाहिजे अशी अपेक्षा आहे. ही परीक्षा लेखी आणि मौखिक अशा दोन्ही स्वरूपांची राहील.

(१) लेखन—यांत पत्रलेखन, स्थलवर्णन व वृत्तांतवर्णन यांचा समावेश केला जाईल.	गुण ५०
(२) वाचन—यांत, वाचलेल्या मजकुरांतील आशय योग्य शब्दांत व्यक्त करण्याची पात्रताहि अपेक्षिली आहे.	गुण ३०
(३) संभाषण—भोवतालच्या परिस्थितीसंबंधी विचारलेल्या सोप्या प्रश्नांचीं उत्तरें देतां आलीं पाहिजेत.	गुण २०

(या परीक्षेकरिता कोणतेंहि विशिष्ट क्रमिक पुस्तक नेमलेलें नाही.)

मराठी प्रारंभ :

प्रश्नपत्रिका १. गुण १००

१. गोड गोष्टी भाग २—साने गुरुजी
२. सारस्वत पाठमाला भाग २
३. लेखनव्यवसाय भाग १ व २—(प्रभु व पाटणकर)

साहित्यविनीत :

प्रश्नपत्रिका १–गद्य व पद्य–गुण–१००. पाठ्यपुस्तकें (८०)

१. माणिक—ना. वि. कुळकर्णी (२०)
२. माझ्या आठवणी व अनुभव भाग १—वि. रा. शिंदे (२०)
३. सत्तेचे गुलाम—वरेरकर (२०)
४. सुमनसंचय—२०

व्याकरण, वृत्तें व अलंकार—(२०)

यांवर नेमलेल्या पुस्तकांवरून उद्भवणारे ठोबळ प्रश्न येतील. पाठभेदाचे प्रश्न घालण्यांत येणार नाहीत. शिफारस केलेलीं पुस्तकें :

१. व्याकरणप्रवेशिका—श्री. भावे कुलकर्णी
२. वृत्तालंकारदीपिका—पु. गो. निजसुरे
३. शुद्धलेखनमंडळाचे नियम—(महाराष्ट्रसाहित्यपरिषद, पुणें)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यपरिचित :

प्रश्नपत्रिका १ ली–पद्य (गुण: १०० ; पाठ्य पुस्तकें : ८०)

१. आमच्या देशाची स्थिति—चिपळूणकर [२०]
२. मधुकर—विनोबा [२०]
३. इंदुकाळे व सरला भोळे—वा. म. जोशी [२०]
४. सत्वपरिक्षा—कृ. प्र. खाडिलकर [२०]
५. निबंध—सर्वसामान्य विषयांवर [२०]

प्रश्नपत्रिका २ री–पद्य (गुण: १०० ; पाठ्य पुस्तकें : ७०)

१. नलदमयंती-स्वयंवराख्यान—संपादक चनहट्टी [३०]
२. पांच कवि—संपादक राजाध्यक्ष [४०]

व्याकरण, वृत्तें, रस अलंकार इत्यादि [३०]

यांवर साधारणपणें दोन्ही प्रश्नपत्रिकांमधील पाठ्य पुस्तकांवरून उद्भवणारे प्रश्न येतील. शिफारस केलेलीं पुस्तकें :

१. मराठी दीपिका—वि. मि. कोलते
२. वृत्तें व अलंकार—वि. म. कुळकर्णी
३. मराठी साहित्य आणि व्याकरण—मोने (व्याकरणाचा भाग)

साहित्यस्नातक :

प्रश्नपत्रिका १ ली–गद्य (गुण: १००)

१. आज्ञापत्र [२५]
२. विचार सौंदर्य—वा. म. जोशी [२५]
३. प्रेम शोधन—श्री. कृ. कोल्हटकर [२५]
४. भंगलेलें देऊळ—ग. त्र्यं. माडखोलकर [२५]

तंत्रविषयक मार्गदर्शनासाठी

प्रतिभा साधन—ना. सी. फडके

प्रश्नपत्रिका २ री–पद्य (गुण: १००)

१. ज्ञानेश्वरी—अध्याय १ ला (राजवाडे प्रत) [२०]
२. श्लोककेकावली—मोरोपंत [२०]
३. फुलांची ओंजळ—Bee [२५]
४. भग्नमूर्ति—आ. रा. देशपांडे [२०]

रस, अलंकार इ. (नेमलेल्या पुस्तकास धरून) [१५]

अलंकारचंद्रिका—गोरे

प्रश्नपत्रिका ३ री–(अ) व्याकरण व साहित्य (७०)

१. मराठीची सजावट भाग १ व २—मुजुमदार } ३५
२. मराठी साहित्य आणि व्याकरण—मोने }
३. काव्यालोचन—द. के. केळकर [३५]

(आ) निबंध (३०) सर्वसाधारण विषयावर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९४९
आक्टोबर

साहित्य पारंगत : (आगस्ट १९५० पासून पुढे)

प्रश्नपत्रिका १ ली—गद्य (१००)

१. लीळाचरित्र-एकांक—सं. नेने
२. भाऊसाहेबांची बखर
३. संपूर्ण आगरकर भाग १
४. सुदाम्याचे पोहे—कोल्हटकर
५. रणांगण
६. वायुलहरी—खांडेकर

प्रश्नपत्रिका २ री—पद्य (१००)

१. नरेंद्रकृत रुक्मिणी स्वयंवर—सं. कोलते
२. अभंगवाणी—सं. म. गो. मोडक
३. सीतास्वयंवर—नागेश
४. वाग्वैजयंती—गोविंदाग्रज
५. आराधना—वा. ना. देशपांडे
६. सुधारक—मा. त्रिं. पटवर्धन

प्रश्नपत्रिका ३ री—वाङ्मयप्रकार-नाटक (१००)

१. रामराज्यवियोग—किर्लोस्कर
२. शारदा—देवल
३. विद्याहरण—खाडिलकर
४. भावबंधन—गडकरी
५. सोन्याचा कळस—वरेरकर
६. उद्यांचा संसार—अत्रे
७. आंधळ्याची शाळा—वर्तक
८. मतिविकार—कोल्हटकर

तंत्रविषयक मार्गदर्शनासाठी—'अर्वाचीन मराठी साहित्य' यांतील नाटकावरील प्रकरण.

प्रश्नपत्रिका ४ थी (अ)—व्याकरण (५०)

१. मराठी व्याकरणावरील निबंध—कृष्णशास्त्री चिपळूणकर
२. शास्त्रीय मराठी व्याकरण—मो. के. दामले

(आ) वाङ्मयेतिहास (५०)

१. महाराष्ट्र-सारस्वत भाग १ व २—भावे
२. मराठी भाषेचा व वाङ्मयाचा इतिहास—भिडे
३. अर्वाचीन मराठी साहित्य—सं. नेने
४. अर्वाचीन मराठी काव्य—रा. श्री. जोग

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रश्नपत्रिका—५ वी-(अ) साहित्यशास्त्र व अलंकार (५०)

१. अभिनव काव्यप्रकाश—रा. श्री. जोग
२. मराठीचें साहित्यशास्त्र—डॉ. मा. गो. देशमुख
३. प्रा. बनहट्टीचें दर्यापूरचें भाषण
४. विचार समीक्षा—वा. ना. देशपांडे

(आ) निबंध (५०)

निबंधासाठी विषय वाङ्मयविषयक प्रचलित प्रश्न व आंदोलनें, साहित्य-शास्त्रीय व्यापक सिद्धान्त इ. संबंधाचे असतील. स्थूल दिग्दर्शनासाठी पुढील पुस्तकें निर्दिष्ट केलीं आहेत.

१. नवीं मूल्यें—पु. य. देशपांडे
२. वाङ्मयीन महात्मता—मर्ढेकर
३. साहित्याचा ध्रुवतारा—वाळिंबे.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

रा. पु. सगदेव,
चिटणीस, परीक्षासमिति.
प्रभा निवास, जेल रोड, नागपूर १.

वि. भि. कोलते,
अध्यक्ष,
परीक्षा समिति, वि. सा. संघ.

पत्रक १ (अ)

विदर्भ साहित्य संघ—परीक्षा समिति

पुरवणी नियमपत्रक.

१. आगस्ट १९५० पासून साहित्यपारंगतची परीक्षा वर्षांतून फक्त एकदाच आणि तीहि ऑगस्टमध्ये होत जाईल. साहित्यस्नातक किंवा तत्सदृश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर एक वर्षाच्या आंत परीक्षेला बसतां येणार नाही.
२. वि. सा. संघाच्या कोणत्याहि एका परीक्षेला बसून अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला इतर नियमांच्या आधारें पुढील परीक्षेला बसतां येणार नाही.
३. अन्य भाषेंतील पदवी-परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मराठीभाषाभाषी उमेदवाराला एकदम साहित्यस्नातक या परीक्षेला बसण्याची परवानगी देण्यांत येईल.
४. साहित्यपारंगत परीक्षेचा बदललेला अभ्यासक्रम ऑगस्ट १९५० पासून अंमलांत येईल.
५. परीक्षेची फी परत केली जाणार नाही; पण योग्य कारण आगाऊ कळविल्यास ती फी त्याच परीक्षेला त्यानंतर होणाऱ्या फक्त एकाच खेपेकरिता राखून ठेवण्यांत येईल.

वि. भि. कोलते,
अध्यक्ष, परीक्षा समिति वि. सा. संघ.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी, एम्.ए.
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ, अमरावती (वऱ्हाड)
यांजकडून.

विदर्भ साहित्य संघाचे नवीन सभासद

सन १९४९ पासून विदर्भ साहित्य संघाचे खालीलप्रमाणे नवीन सभासद झाले आहेत :

१. श्री. दिवाकर महादेव देशमुख, उमरेड
२. सौ. इंदिराबाई लोकरे, उमरेड
३. डॉ. वामन चिंतामण सहस्रबुद्धे, उमरेड
४. ,, हरि केशव औरंगाबादकर, उमरेड
५. श्री. बी. एम्. सुदामे, उमरेड
६. ,, कालीचरण गणुजी नंदागवळी, गोन्दिया
७. ,, बाळकृष्ण काशीनाथ देशमुख, गोन्दिया
८. ,, पुरुषोत्तम रामकृष्ण जोशी, गोन्दिया
९. ,, बाळकृष्ण नारायणराव मार्डीकर, गोन्दिया
१०. ,, मुख्याध्यापक, सिटी हायस्कूल, चान्दा
११. ,, मुख्याध्यापक न्यू इंग्लिश स्कूल, चान्दा
१२. ,, गोविन्द नीळकंठ हस्तक, चान्दा
१३. ,, नीळकंठ कृष्ण सदाफळ, चान्दा
१४. ,, तु. ना. काटकर, चान्दा
१५. ,, शिवराव रघुनाथ भगाडे, काटोल
१६. ,, केशव रामचन्द्र राजकारणे, काटोल
१७. ,, मुकुन्द बाळकृष्ण रोटीवार, काटोल
१८. ,, यशवन्त महादेव बाकरे, काटोल
१९. ,, विठ्ठल शंकरराव पांडे काटोल
२०. ,, दत्तात्रेय वासुदेव वाघासुंदर, काटोल
२१. ,, रामचन्द्र लक्ष्मण नाईक, काटोल
२२. ,, भीमराव पुरुषोत्तम तुंबडे, काटोल
२३. ,, गोपाळ अमृत भांडारकर, काटोल

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२४. ,, वसंत वामन परसोडकर, काटोल
२५. ,, मुख्याध्यापक बनारसीदास रुइया हायस्कूल, काटोल
२६. ,, चिटणीस नागपूर मराठी साहित्य सभा, नागपूर
२७. ,, प्रा. दा. ल. अडोणी, सागर
२८. गोविन्दराव कृष्णराव मुंगशीकर, मुंगशी
२९ ,, गोविन्द शेषराव सरनाईक, कौटा (अकोला)
३०. ,, मा. ब. काशीकर, उमरखेड
३१. श्री. वि. सि. पाटील, उमरखेड
३२. ,, म. ल. गुलाखे, उमरखेड
३३. ,, पु. अं. पिंपरखेडे, उमरखेड
३४. ,, म. शं. शर्मा, उमरखेड
३५. ,, ना. स. काळेश्वरकर, उमरखेड
३६. ,, गो. ल. औरंगाबादकर, उमरखेड
३७. ,, म. ग. देशपांडे, उमरखेड
३८. ,, उ. तु. शेवाळकर. उमरखेड
३९. ,, मा. गो. साकरकर, उमरखेड
४०. के. स. महाजन, उमरखेड
४१. ,, गो. व्यं. साकळे, उमरखेड
४२. ,, ग. अं. जोशी, उमरखेड
४३. ,, द. नि. जोशी, उमरखेड
४४. ,, नृ. सी. अगरवाल, अमरावती
४५. ,, माणिक बैतुले, नागपूर
४६. ,, सुपसांडे, नागपूर
४७. प्रा. अ. ना. देशपांडे, नागपूर
४८. श्री. कृष्णराव महादेव धोटे, वर्धा
४९. सौ. सुशीलाबाई अग्रवाल, वर्धा
५०. डॉ. ताराबाई खेर, वर्धा
५१. डॉ. य. त्र्यं. गद्रे, वर्धा
५२. श्री. चं. गो. खेर, जबलपूर
५३. ,, ब. ता. काटे, अकोला
५४. ,, वसंत द्वारकानाथ प्रधान, अकोला
५५. ,, गो. ना. निवसरकर, अकोला.

सुमन संचयाची दुसरी आवृत्ति

विदर्भ साहित्यसंघाने संपादित व प्रकाशित केलेल्या व मध्यप्रांत वऱ्हाड हाय. एज्यु. बोर्डाने मॅट्रिकच्या अभ्यासक्रमांत समाविष्ट केलेल्या 'सुमनसंचय' या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ